# काव्यविहार

## पुस्तक पहिलें

१२२३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. १२८४

REFBK-0002343
REFBK-0002343

ग्रंथ संग्रह
१७८४१८
अनुक्रमांक १०२४
विभाग ९२८७
क्रमांक ७३।९।४५
नों. दि.
वाचनालय शाखा

# काव्यविहार

## पुस्तक पहिलें

2343

REFBK-0002343
REFBK-0002343

मुद्रकः—दा. र. मित्र, मनोरंजन प्रेस, मुंबई नं. ४.
प्रकाशकः—यशवंत दत्तात्रय गोखले,
प्रोप्रायटर—गोखले आणि मंडळी, बुधगांव, S. M. C.

[ या पुस्तकासंबंधी या आवृत्तीसुद्धां सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपले स्वाधीन ठेविले आहेत. ]

# काव्यविहार

## पुस्तक पहिलें.

---

कविः—

श्रीयुत डी. व्ही. गद्रे (काव्यविहारी)
बी. ए., एलूएल्. बी.
मराठीचे प्रोफेसर, विलिंग्डन कॉलिज, सांगली.

---

प्रकाशकः—
गोखले आणि मंडळी,
बुधगांव, S. M. C.

---

फेब्रुआरी १९२३.

---

किंमत चौदा आणे.

# अर्पणपत्रिका.

मिरजमळा संस्थानचे अधिपति

## श्रीमंत माधवराव बाबासाहेब पटवर्धन

यांचे सेवेसी

श्रीमंतांनीं शिक्षणदानरूपानें मजवर केलेल्या उपकारां-
बद्दल वाटत असलेल्या कृतज्ञतेचें अल्पसें
द्योतक ह्मणून ही माझी कृति, श्रीमं-
तांच्या परवानगीनें सादर
अर्पण केली असे.

श्रीमंतांचा कृपाभिलाषी,

**काव्यविहारी.**

मिरजमळा संस्थानचे अधिपति

अनुक्रम
विभाग
दिनांक



श्रीमंत माधवराव बाबासाहेब पटवर्धन, बुधगांव.

## 'काव्यविहारा'चे कवि



'काव्यविहारी,'

श्रीयुत प्रो. डी. व्ही. गद्रे, बी. ए., एल्एल्. बी.

# प्रस्तावना.

अनुक्रम ९८५७९
विभाग
क्रमांक
नों. दि. १३।९।
वाचनालय शाखा



**कै. डॉ. पां. दा. गुणे,** M. A. PH. D.

**काव्यविहारास** माझे परमपूज्य गुरुवर्य कै. डॉ. **पां दा. गुणे,** M A. PH. D., हे प्रस्तावना लिहिणार होते. डॉक्टरसाहेबांच्या शोचनीय निधनानें 'काव्यविहार' या प्रेमछत्रास पारखा झाला. अशा स्थितींत कै गुरुवर्यांच्या आत्म्याचा मंगल आशीर्वाद हीच माझ्या 'काव्यविहारा'ची प्रस्तावना आहे.

—काव्यविहारी.

# आत्मनिवेदन.

माझे परमपूज्य गुरुवर्य कै. डॉ. **तात्यासाहेब गुणे**, M. A. PH. D. यांच्या प्रस्तावनेसह 'काव्यविहार' प्रेमळ वाचकांचे हातीं देण्याचा माझा संकल्प कालाच्या कठोर कृतीनें फोल ठरविला. इ. स. १९१५ मध्यें विद्यार्थी या नात्यानें डॉ. **गुणे** यांच्याशीं माझा संबंध जडल्यापासून त्यांचें मद्विषयक शिष्यप्रेम आमरणांत उत्तरोत्तर वृद्धिंगतच होत गेलें. आरंभापासून माझ्या वेड्यावांकड्या काव्यकृति प्रेमळ नजरेनें पाहून, व त्यांसंबंधीं अनेक महत्वाच्या सूचना करून कै. **तात्यासाहेबांनीं** मला अमोल साहाय्य केलें होतें 'काव्यविहारा'च्या प्रकाशनाची पूर्व तयारी चालू असतांना प्रकृति अत्यंत अस्वस्थ असतांनाहि, 'काव्यविहारा'तील कवितांची निवड कै. **तात्यासाहेबांनींच** केली होती. 'काव्यविहारा'वर आरंभापासून याप्रमाणें लोभ करणारे माझे गुरुवर्य 'काव्यविहारा'चें प्रकाशन पहावयास जगले नाहींत, ही माझ्या दुर्दैवाची परिसीमा आहे. अशा विपरीत स्थितींत कै. गुरुवर्यांचा मंगल आशीर्वाद हीच प्रस्तावना समजून, या प्रस्तावनेसह माझा 'काव्यविहार' मी प्रेमळ वाचकांच्या हातांत देत आहें.

मी काव्यलेखनास आरंभ केल्यापासून अनेक गुरुतुल्य व अधिकारी व्यक्तींनीं केलेल्या सूचना व दिलेलें प्रोत्साहन, तसेंच, माझ्या अनेक मित्रांनीं व हितचिंतकांनीं दाखविलेलें आपलेपणाचें प्रेम, यांचेंच दृश्यफल ह्मणजे प्रस्तुतचा 'काव्यविहार' आहे यांपैकीं विद्यमान व्यक्तींचा साभार नामनिर्देश 'आभारप्रदर्शन' या प्रकरणांत

मीं केलेलाच आहे. दिवंगत व्यक्तींपैकीं ज्यांचा 'काव्यविहारा'शीं प्रत्यक्ष संबंध आला अशांपैकीं कै. **गोविंद बल्लाळ देवल**, कै. **प्रि. वासुदेव बळवंत पटवर्धन**, कै. **काशीनाथपंत मित्र** व कै. **गणेश विठ्ठल कुळकर्णी**, हे प्रमुख होत. कै. **देवल** हे आमचेच गांवचे ह्मणजे हरीपूरचे रहिवासी असून, त्यांचा व माझा गुरुशिष्य या नात्यानें बराच परिचय होता. प्रि. **पटवर्धन** हे तर प्रत्यक्ष माझे गुरुच होते. त्यांनींहि वेळोवेळीं मार्मिक सूचनांच्या रूपानें मला अमोल साहाय्य केलें होतें. वरील दिवंगत गुरुवर्यांचे माझ्यावरील उपकार आमरण माझे स्मरणांत राहतील. कै. **मित्र** व कै. **कुळकर्णी** हे अनुक्रमें **मनोरंजन** व **'नवयुग'**, **'उद्यान'**या मासिकांचे संपादक असल्यानें व'काव्यविहारां'-तील बरीच कविता याच मासिकांत प्रसिद्ध झाली असल्यानें, उभयतांचे व माझे स्नेहसंबंध उभयतां दिवंगत होईपर्यंत दृढतरच होत गेले. वरील सर्व दिवंगत गुरुवर्यांच्या व स्नेह्यांच्या आत्म्यांना 'काव्य-विहारा'च्या प्रकाशनानें आनंद होईल व त्यांच्या कृपेचें व सदिच्छांचें छत्र ' काव्यविहारा'वर सदैव राहील असा मला भरंवसा आहे.

'काव्यविहारा'च्या अंतरंगासंबंधी येथें कांहींच न लिहितां, मला फक्त कवितांच्या अनुक्रमासंबंधी दोन शब्द लिहावयाचे आहेत. 'काव्य-विहारां'तील कवितांचा बहुधा कालानुक्रमच ठेविलेला आहे. भावनेसाठीं अगर विषयानुसंधानासाठीं क्वचित् कविता मागेंपुढें केलेल्या असल्या तरी प्रत्येक कवितेखालीं रचनाकाल असल्यानें अनुक्रमास बाध येणार नाहीं. पृष्ठ ७२ वरील **'एवढीच आशा'**या कवितेचा रचनाकाल नक्की लक्षांत नसल्यानें तो मात्र दिलेला नाहीं. तथापि अनुक्रमाच्या दृष्टीनें ती कविता बरीच पुढें गेली आहे असें मला वाटतें. 'काव्य-विहारा'संबंधी यापेक्षां जास्त मला या स्थलीं कांहींच लिहितां येत नाहीं.

सरतेशेवटीं, ज्या रसिकांच्या आजवर मिळालेल्या प्रोत्साहनानें, 'काव्यविहारा'चे प्रकाशनास मी उद्युक्त झालों आहे, त्यांना 'काव्य-विहार 'रूपानें केलेली ही अल्पस्वल्प सेवा गोड करून घेण्याबद्दल विनंती करून, मी हें आत्मनिवेदन पुरें करितों.

बुधगांव,
२०–२–१९२३.

रसिकांचा नम्र,
काव्यविहारी.

# आभार.

**मिरजमळा** संस्थानचे अधिपति, **श्रीमंत माधवराव बाबासाहेब पटवर्धन** यांनीं या माझ्या कृतीस प्रोत्साहन देऊन व ती स्वतःला अर्पण करण्याची परवानगी देऊन मजवर आजपर्यंत केलेल्या उपकारांत भर टाकिली. त्याचप्रमाणें **इचलकरंजी** संस्थानचे अधिपति **श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे** यांनीं काव्यविहारांतील कविता वाचण्याची तसदी घेतली आणि अभिप्राय व मदत देऊन मला ऋणी केलें आहे. या उपकारांबद्दल उभयतां श्रीमंतांचा मी अत्यंत ऋणी आहें.

**इंदूरचे श्रीमंत माधवराव किबे,** M. A., M. R. A.S., **सांगली** विलिंग्डन कॉलेजचे प्रिन्सिपाल गुरुवर्य **गोविंद चिमणाजी भाटे** M. A. व प्रख्यात मराठी नाटककार, कवि, टीकाकार व विनोदी लेखक गुरुवर्य **श्रीपाद् कृष्ण कोल्हटकर,** B. A., LL. B., या त्रिवर्गांनीं मला आजपर्यंत अनेक तऱ्हेनें प्रोत्साहन दिलें व आतां 'काव्यविहारा'वर अभिप्राय देऊन उपकृत केलें आहे. याबद्दल या त्रिवर्गांचा मी अत्यंत आभारी आहे.

माझे मुंबईचे चुलते ती. रा. रा. **बळवंत विनायक लेले** व **बेळगांवचे** स्नेही डॉ. **केशव वामन साठे** M. B. B. S. या उभयतांच्या मजवरील अकृत्रिम प्रेमाबद्दल, व काव्यविहाराचे बाबतींत त्यांनीं वेळोवेळीं घेतलेल्या तसदीबद्दल त्यांचे आभार मानणें औपचारिक दिसेल, तथापि त्यांचे नांवाचा या स्थलीं कृतज्ञतापूर्वक उल्लेख केल्या-वांचून माझ्यानें राहवत नाहीं.

**मनोरंजन** छापखान्याचे चालक श्रीयुत **दामोदरपंत मित्र, मनोरंजनाचे** सहकारी संपादक श्रीयुत **वि. जि. नाडकर्णी** व छापखाना सुपरिंटेंडंट श्रीयुत **शां. ता. आजगांवकर**, B. A. यांनीं कै. **काशीनाथपंतांच्या** मागें पूर्वसंबंध कायम ठेवून, काव्यविहाराचें काम अल्पावधींत उत्तम रीतीनें करून दिलें, याबद्दल या सर्वांचा मी आभारी आहें.

वर निर्दिष्ट केलेल्या व्यक्तींशिवाय अनेकांनीं, अनेक तऱ्हेनें 'काव्यविहारा'स प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष साहाय्य केलें आहे, त्या सर्वांचा नामनिर्देश स्थलाभावामुळें येथें करणें शक्य नाहीं. ह्मणून अशा सर्व साहाय्यकर्त्यांचे या स्थलीं एकत्र आभार मानून हें 'आभार' प्रकरण पुरें करितों.

बुधगांव,
ता. २०-२-१९२३.

सर्वांचा नम्र,
**काव्यविहारी.**

# अनुक्रमणिका.


| नंबर. | कविता. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | शारदास्तवन | १ |
| २ | फुलाची विनंति | २ |
| ३ | चंद्रोदय | ३ |
| ४ | चंद्रास | ४ |
| ५ | तरंग | ५ |
| ६ | कृष्णाकांठीं | ७ |
| ७ | मनस्ताप | ९ |
| ८ | आशा–निराशा | १० |
| ९ | हंसणारी कलिका | १५ |
| १० | उद्यानांत | १७ |
| ११ | प्रेम आणि काव्य | १८ |
| १२ | पिंजऱ्यांतील पोपटास | २० |
| १३ | निरोप | २२ |
| १४ | सांत्वन | २३ |
| १५ | ध्यास | २४ |
| १६ | 'दावा मजला कोणितरी' | २५ |
| १७ | माझी बांसरी | २६ |
| १८ | एकच क्षण | २९ |
| १९ | परीक्षेचा बळी | ३० |
| २० | हृदयाचें गान | ३४ |
| २१ | हंसणाऱ्या बालिकेस | ३६ |
| २२ | युरोपियन मुलास पाहून | ३९ |

| नंबर. | कविता. | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| २३ | शुभमंगल सावधान | ४१ |
| २४ | 'त्रिमुकला संसार | ४८ |
| २५ | कै. केशवसुतास | ५१ |
| २६ | केशवसुतांची कविता वाचून | ५३ |
| २७ | सवाल ( १ ला "नवें कां जुनें !" ) | ५४ |
| २८ | सवाल २ रा "धर्म बुडतो काय ?" | ५६ |
| २९ | सवाल ३ रा "आंधळे कीं डोळसे ?" | ५७ |
| ३० | सवाल ४ था "तुह्मीं कोण ?" | ६० |
| ३१ | पूर्वस्मृति | ६२ |
| ३२ | स्थित्यंतर | ६३ |
| ३३ | हिंदी तरुणास | ६४ |
| ३४ | बॅकबेच्या वाळवंटांत | ६५ |
| ३५ | बॅकबेच्या वाळवंटांत ( नं. २ ) | ६८ |
| ३६ | मित्रस्मरण | ६९ |
| ३७ | हृदयेश्वरीस | ७० |
| ३८ | चार शब्द | ७२ |
| ३९ | एवढीच आशा | ७२ |
| ४० | आकाशदिवा पाहून | ७४ |
| ४१ | पूर्व—पश्चिम | ८१ |
| ४२ | सिंहगड सोडतांना | ८२ |
| ४३ | स्फुट अभंग | ८८ |
| ४४ | एक मागणें | ८९ |
| ४५ | रसिकांस विनंति | ९० |

2383
अनुक्रम
नों. दि.
...ालय

# काव्यविहार

## पुस्तक पहिलें

### १ शारदास्तवन

शार्दूलविक्रीडित

कोठें वास तुझा ? अनंत गगनीं कीं कृष्ण मेघोदरीं ?
किंवा नीलसरोवरीं वससि तूं उत्तुंग शैलावरी ?
उद्यानीं नवपंकजांत अथवा वायूवरी राहसी ?
स्फूर्ती देउनियां सदा कविमना विश्वासवें खेळसी. १
देवी ! शोधियलें तुला बहुपरी, धांवें म्हणी, शारदे !
देईं दर्शन, अंत केंवि बघसी ? माझी दया येउं दे.
सेवावें पदपद्म भृंग बनुनी ही आस भारी मनीं;
दासाचें पुरवोनि कोड इतुकें, स्फूर्तीस दे स्वामिनी. २
कोठें मी नर क्षुद्र मंदधि, कुठें स्वर्गीय तूं देवता,
मोठेही शिणले कितीक तुझिया पादांबुजा सेवितां.
काव्याचा हृदयांत लेश नसतां, देवी ! तुला सेवणें
वाटे दुस्तर; पादहीन मनुजें हेमाद्रि उल्लंघणें. ३
झाले, होतिल, दास गे, कितितरी माझ्याहुनी उज्वल;
देवी ! लोटुं नको यथामति यशा गाईन मी निर्मल;
वेडें बेसुर वांकडें तुज गमे कीं गान माझें जरी,
प्रेमें मानुनि घे विरिंचिदुहिते ! सर्वज्ञ काव्येश्वरी ! ४

हरीपूर,
जानेवारी १९१५.

---

# २ फुलाची विनंति

[ खालील कविता ह्मणजे माझा काव्यविषयक
पहिलाच प्रयत्न आहे. ]

( चाल—चंद्रकांत राजाची कन्या. )

एके दिवशीं आनंदानें बागेमाधिं गेलों;
नयनमनोहर पुष्प देखुनी हर्षभरित झालों. १
झडकरि जाउनि जाइपुष्प तें हस्तानें खुडिलें.
मानुषवाणी धारण करुनी पुष्प मजसि बोले. २
" रे ! रे सखया, आतां हें त्वां मजसी तोडियलें,
माझ्या बाला ! उपकार तुझे मजवरि बहु झाले, ३
दुष्ट भ्रमर ते नित्य येउनी मजसि गांजिताती,
दुर्मिळ ऐसा मधुर मधू ते बहु घेउनि जाती. ४
मधु गेल्यावरि पर्णावरि मी कोमेजुनि पडतों,
पडल्यावरि मी कोणि न मज मग सुवासासि घेतो." ५
रे बाला ! मी आजि सुदैवें तव हातीं पडलों,
वाटे आतां त्या दुष्टांच्या त्रासांतुनि सुटलों. ६
झडकरि नेउनि भगवच्चरणीं त्वां मज अर्पावें,
वाटे मजसी तत्पदिं पडुनी धन्य जगीं व्हावें." ७
जडवस्तूंच्या चातुर्यानें कुंठित मी झालों,
त्या पुष्पासी हस्तीं धरुनी धांवत घरिं गेलों. ८
द्वारामाजी धांवत धांवत प्रिय भगिनी आली,
"दादा ! देईं पुष्प मजसि हें," ऐसें मज वदली. ९

"वेणींमाजी लेउनि यासी मस्तक सजवाया,
देइं कुसुम मज, आशा माझी करूं नको वार्या." १०
भगिनीसाठीं पुष्पविनति मी विसरुनियां गेलों,
भगिनीप्रेमा बळी पडुनियां निष्ठुर मी झालों. ११
म्यां दुष्टानें त्या पुष्पासी तिच्या करीं दिधलें,
पुनः एकदां दीनपणानें पुष्प मजसि बोले. १२
"हाय! हाय! मी जगन्नियन्त्या प्रभुपाया मुकलों,
व्यर्थ व्यर्थ मी, अरे घातक्या! तव हातीं पडलों. १३
भ्रमराहातीं पडलों जरि मी मधुतरि ते खाती,
चुरडुनि जाइन व्यर्थ गड्या मी पडलों तव हातीं." १४
लज्जित होउनि मग त्याला मीं गृहाकडे नेलें,
जगन्नियन्त्या प्रभुच्या चरणीं त्यासी वाहियलें. १५
कुसुमासम मन प्रत्येकानें जरि ईशा दिधलें,
वाटे त्यानें जन्मा येउनि कर्तव्यचि केलें. १६

हरीपूर,
सप्टंबर १९१२.

---

## ३ चंद्रोदय

( चाल—भेदिती गृहभेदि हे. )

गमत सुखकर समय हा,
तेजराशी कुमुदबांधव येत सदनांगणिं पहा. ॥ गमत० ॥ १
तारकागण अंबरीं,
तेज वितरे किતितरी,
गगनसागरवीचिगत हा फेन पसरे नभिं अहा! ॥ गमत० ॥ २

प्रणयविकला रोहिणी
प्रियकरा अवलोकुनी
हार गुंफुनि तारकांचा अर्पिते विधुला पहा. ॥ गमत० ॥ ३
नीलमंडलसारिं जसें
शुभ्र पंकज गमतसे,
पूर्ण फुललें ह्मणुनि सगळें विश्व खुललें किति अहा ! ॥ गमत० ॥ ४
विबुधललना क्रीडती,
रत्नकंदुक फेंकिती,
अमररमणीपादतलहत ह्मणुनि विहरे गगनिं हा. ॥ गमत० ॥ ५

पुणें,
आगस्ट १९१५.

---

## ४ चंद्रास

[ चांदण्यारात्रीं आकाशाकडे लक्षपूर्वक पहावें. वास्तविक चंद्र स्थिरच असतो, पण ढगांच्या विशिष्ट गतींमुळें तोच सरकत आहे असा भास होतो. अशा सरकणाऱ्या ( चालणाऱ्या ) चंद्राकडे पाहून:—]

दिंडिवृत्त

सर्वे घेवोनी विमल तारकांला,
आत्मतेजें खुलवीत अंबराला,
खुणविलें कां तुज रम्य कुमुदिनीनें,
अधरसेवाया जासि नभपथानें. १
विरहतापें रोहिणी तप्त झाली,
दुःख दाटे पांडुता येइ गालीं,
सवतसुख नच साहवे कां तियेला,
म्हणुनि गाळी तारका अश्रुमाला. २

खनी प्रेमाची गमत कुमुदिनी ही,
वृथा सखया ! अंतरीं प्रेम नाहीं,
जोंवरी तूं विलससी अतुल तेजें,
प्रणय दावी हास्य तें मुखिं विराजे. ३
वदनिं तुझिया लावुनी अचलदृष्टी,
दावि तुजला जणुं करित प्रणयवृष्टी;
सहज मुरडोनी चपल नयनपातें,
करी सुहृदा ! घायाळ तव हृदातें. ४
दैव–योगें जरि होसि तेजहीन,
त्यजुनि तुजला सेवील मधुप जाण;
जेंवि गणिका लोटुनी निर्धनाला,
प्रणय दावुनि सेविते धनवताला. ५
हृदय फिरलें अंधता येइ नेत्रीं,
त्यजिसि दयिता रोहिणी मृदुलगात्री;
प्रणयठेवा गेहिंचा सोडुनीयां
वृथा जासी परचुंबनीं रमाया. ६.

हरीपूर,
जानेवारी, १९१६.

---

## ५ तरंग

[ नुकतेंच चुरडलेलें एक फूल पाहून. ]

हें काय जाहलें दैवा ! चुरडिलें कुणीं सुमना या ?
पाषाणहृदय कोणाचें, अंतरीं नुपजली माया !

विच्छिन्न देह जरि याचा,
बोलाया नाहीं वाचा;
जगिं कोण वालि दीनाचा !
दुःखानें जर्जर झालें ! आसन्नमरण हें पडलें ! १
या दीन मधुर सुमनानें, अपराध कुणाचा केला—
मातेच्या अंकावरुनी, ओढिलें ह्मणोनी याला ?
विश्वाच्या साम्राज्यांत,
शीतोष्ण सोसुनी वात,
नाचलें प्रमोदें हंसत !
गोजिरें कुणा नावडलें, ह्मणुनियां काय हें खुडिलें ? २
उपवनीं पातलों तेव्हां, मीं काल देखिलें नुकतें;
वाऱ्याचा करुनी झोला, राजस हें खेळत होतें !
रिझवाया मानस गमलें;
स्वातंत्र्य मूर्त अवतरलें;
हंसवुनी आपणहि हंसलें !
परि आज कसें तें सगळें, मधु हास्य लयाला गेलें ! ३
कितितरी अमोलिक रत्नें, उदधीच्या उदरीं वसती;
जन्मती वनीं किति सुमनें, क्षण हंसती, विलया जाती !
हा दुष्ट काल दिनरात
सांठवी सकल उदरांत,
सुमन हें चाललें त्यांत !
किति जरी हृदय हें पिटिलें, येतें तें आतां कसलें ? ४
येतांच रात्र, आकाशीं, चमकतील ताराराशी,
खुलवीत पुनः जगतासी, येईल भानु उदयासी,

मधु सुमें अमित फुलतील,
पुनरपी वनीं हंसतील,
आनंदें जग भरतील;
परि दीन बापुडें छकुलें, संतत या जगता मुकलें. ५

पुणें, जानेवारी, १९१६.

---

## ६ कृष्णाकांठीं

### एक समाजदृश्य

सळ—सळ—सळ—सळ उसळति लहरी क्षुब्ध जाहली नगतनया;
घों घों घों घों घोर समीरण थर थर कांपवि जनहृदया. १
थड—थड लाटा खडकावरती घालुनि घेती वेगानें;
भग्न होउनी पुनरपि जाती, खेळ खेळती मोदानें! २
नव—जलदांनीं गगन कोंदलें, वीज कडाडे मधुमधुनी;
प्रलयकाल जणुं जवळीं आला, थरथर कांपे ही अवनी. ३
जणु भीतीनें तारा लपल्या, तिमिर संचरे स्वैरपणें;
भेसुर लीला ऐशा रीतीं निसर्ग दावी लीलेनें. ४
सोडुनि जन—संपर्क पातलें भीषण समयीं कोण इथें?
रंज—गांजलें खल जगतानें; असेल कोणीं मज गमतें! ५
हंसुनी चपला द्रावित सकलां जगतिं चाललें हें काय?
ढाळित अश्रू येथ बैसली दिसते अबला ही; हाय! ६
केश विखुरले, वसन गळालें, हिजला नुरलें परि भान;
घळ घळ घळ घळ अश्रु चालले, ह्मणुनि जाहलें मुख मलिन. ७

अनाथ अबले ! काय जाहलें—विटलिस म्हणुनी जगताला ?
असेल कोणी खळ या भुवनीं चुरडित कोमल कुसुमाला? ८
कीं प्रणयाचा भंग जाहला, काय जिणें हें कामाचें ?
म्हणुनि विरहिणी बससी ऐशी ढाळित अश्रू विरहाचे ? ९
अभागिनी ! तव नाथ हृदाचा सोडुनि गेला जगतास ?
म्हणुनी अश्रू ढाळुनि अबले ! आळविसी जगदीशास ? १०
तरंग ऐसे मनिं उठले, परि—शब्द कुणाचा हा आला ?
"मम हृदयेशा ! तमोमय जगीं सोडुनि" बोले ती अबला. ११
"मम हृदयेशा ! तमोमय जगीं सोडुनि अपुली ही दासी
पथ स्वर्गाचा चढाल, शिवली कधिं न कल्पना हृदयासी. १२
छत्र कृपेचें जोंवरि अपुलें होतें मजवरि प्रियनाथ !
वक्र दृष्टिनें देखाया मज कोणि न धजले जगतांत ! १३
छत्र फाटलें, उघडी पडलें ! बोचुनि खाती जन सगळे !
बोलुनि हृदया घरे पाडिती शब्द सुखाचा कधिं न मिळे !१४
वदति अमंगल दर्शन माझें, दूर लोटिती सकल मला,
दोष काय हा या अबलेचा, काल नेइ मम नाथाला ? १५
गुलामगिरिचें पशुवृत्तीचें जीवन नलगे हें मजला !
माझें जगतीं कुणि न राहिलें ! दुःख सांगु हें कवणाला ?१६
मातापितरें अभागिनीला सोडुनि गेलीं बाळपणीं;
नाथहि गेले मृत्यूवांचुनि थारा नुरला मज भुवनीं ! १७
बंधुजनांनीं त्यजिलें म्हणुनी तूंहि अंतका ! मजवरती;
वल्लभ माझा हरुनी नेला दाविसी आतां अप्रीती ! १८
मूढ जाहलें अथवा काला ! व्यर्थ दोष मीं तुज दिधला !
गतजन्मींचीं घोर पातकें फळासि आलीं समयाला ! १९

अनाथ अबला मजसम दुसऱ्या ढाळिति अश्रू किति भुवनीं !
आत्मसुखानें दग होउनी पुसति न त्यांनां जन कोणीं ! २०
दुःख तयांचें प्रभुरायाला कथन कराया जरि, नाथ !
सोडुनि गेलां या अबलेला घोर तिमिरमय जगतांत ! २१
मधुर सुमांचा सुवास जैसा तेवी अपुली ही दासी;
प्राणवल्लभा ! विरह न सहवे थांबा आलें भेटीसी ! २२
माते ! गंगे ! मज उदरीं घे भेटविं मजला प्रियनाथ;
" आलें—आ—लें नाथ—" ह्मणूनी उडी घेतली उदकांत !२३

* * * *

अबला गेली, जगता मुकली; पर्वा त्याची कोण करी !
निसर्ग हंसलें, चपला खेळे, सळ—सळ—उसळति जललहरी !२४

पुणें, फेब्रुआरी, १९१६.

---

## ७ मनस्ताप

[ जगाविषयीं वैतागलेल्या मनाला केंव्हां केंव्हां असेंहि वाटणें साहजिक आहे ! ]

लाथ मारुनीं जगताला,
धिक्कारुनियां सकलांला,
दूर दूर अति जनपद—विरहित गिरिकंदर मज आवडतें;
तरुवर लतिका खग साचे
मित्र करावे जीवाचे,
अखंड शांती नांदत जेथें त्या स्थळिं मानस मम रमतें. १
निर्झर बालक सृष्टीचें
स्वच्छंदानें वनिं नाचें,
स्वातंत्र्याचा आयुष्पथ तो मज आवडतो मोदमय;

निर्झर मंजुळ गान करी,
अनिल तयाची साथ धरी,
बंधुप्रेमा देखुनि त्यांचा प्रबल उचमळें मम हृदय. २
वेडा ह्मणतिल जन सारे,
वेड लागलें मजसि पुरें,
त्या वेडानें मत्त होउनी दूर झुगारिन जगतास;
द्वेषबुद्धिचा लवलेश
शिवे न ज्यांच्या हृदयास,
प्रेमल ऐशा वनविहरांचा संग नावडे कोणास ? ३
भयाण जगतांतरिं मजला
आशातंतू मुळिं नुरला,
दूर लोटुनी खल जगताला कानन कां नच सेवावें;
नव वनकुसुमें वेंचोनी,
माला त्यांची गुंफोनी,
प्रियमूर्तीचें ध्यान करावें प्रणयचिंतनीं रत व्हावें. ४

पुणें, सप्टंबर, १९१५.

---

## ८ आशा–निराशा

[ कांहीं विशिष्ट कारणांनीं हृदय नैराश्यपूर्ण होऊन जगभर जिकडेतिकडे अंधकार दिसत असतां, आशेचा एकादा अंधुक जरी किरण दिसला, तरी तेवढ्या किरणाच्या प्रकाशानें आपणाला नवजीवन प्राप्त होतें, हा अनुभव कोणाला नाहीं ! ]

( १ )

भीषण रजनी गाढ दाटली,
एकाएकीं भोंवळ आली,

हृदयाची शांती मावळली,
सुखशयनांतुनि थरथर कांपत उठलों खडबडुनी !
अंधारामधिं ताणुनि डोळे,
इकडे तिकडे सभय पाहिलें,
कांहिंतरी दिसलें हललेलें,
कंप सुटे मम सकल तनूला; गेलों डबडबुनी मीं.

( २ )

त्या तिमिरांतुनि कभिन्नकाळी
भेसुर मूर्ती येउनि जवळीं
कर-कर-कर दांतांची कवळी
वाजवुनी, मग नयन रोंखिले भीषण मजवरती
जणुं अग्नीचें स्फुलिंगवर्षण,
गमलें मजला करिती लोचन;
भीतीनें मग उडली गाळण,
'को-को-को-को-कोण,' वदोनी पडलों भूवरती !

( ३ )

"शरीर काळें, हृदयहि काळें,
वदति 'निराशा' जन मज सगळे;
सोडुनियां हे वेडे चाळे,
लक्ष देउनी सकळ आयकें; वदतें मी काय—
सौख्यलवहि तुज नाहीं जगतीं,
नज तुजवर कोणाची प्रीती;
प्रबल निराशा होइल अंतीं
देह त्यजोनी सत्वर जगता सोडुनि तूं जाय!

अनुक्रम ९०४०७ ... ९२४० दि. २३/७/५२ ...लय

( ४ )

" गूढ जरी हें वदशिल कोणा,
हरीन सत्वर तुझिया प्राणां !
जासि कुठें करुनी अवमाना ?"
इतुकें वदुनी हळूहळू मग विलीन हो तिमिरांत !
नैराश्याचें पिशाच भेसुर
तांडव हृदयीं करित अनावर !
तुच्छ वाटलें जग हें क्षणभर !
सोडुनि देहा वसती बरवी गमली मज गगनांत !

( ५ )

काडी ओढुनि दीप लाविला,
जरि चोहिंकडे प्रकाश केला,
अजुनी धडकी मम हृदयाला !
दृश्य मघांचें खेळुं लागलें मदीय नयनांपुढती !
स्वप्नचि सारें दिसलें समजुनि,
भितऱ्या हृदया आश्वासोनी,
हळूंहळूं मी आलों अंगणिं;
सहजगतीनें दृष्टि लाविली वरती गगनप्रांतीं !

( ६ )

कृष्णवर्ण घनपंक्ती झरझर
इकडुनि तिकडे धांवति सत्वर !
सकल गगन जणुं कांपे थरथर !
ऐशा समयीं एक चांदणी लखलखते गगनांत !

जों जों तिजवरि दृष्टि लाविली,
मोठी मोठी होत चालली !
गमत मला तेजाची पुतळी !
पसरत पसरत तेज चाललें, विस्मय ये हृदयांत !

( ७ )

बघतां बघतां तेज फांकलें,
तेजोमय नभ सगळें झालें;
कृष्णवर्ण घन दूर पळाले,
त्या तेजांतुनि मुग्ध बालिका प्रगट होइ गगनांत !
झर झर झर झर उतरे खालीं,
माझ्या संमुख उभी ठाकली;
विषण्ण मजला देखुनि हंसली;
काय वाटलें न कळे, आशांकुर उपजे हृदयांत !

( ८ )

रम्य द्युतिची हंसरी मूर्ती,
शुभ्र कमल नव शोभे हातीं,
धवल वसन विलसे वपुवरती;
हास्यभरानें मोहुनि गेलें विश्व सकल जणुं डोले !
इतुक्यांतचि वीणारव उठला;
झंकाराचा ध्वनि दुमदुमला !
मधुर रवानें वदली बाला
"तुजसी युवका, नैराश्याचें पिसें कोठुनी आलें ?

( ९ )

" जें जें ह्मणुनी घेशिल हातीं
त्यांत त्यांत तुज विजयप्राप्ती
होइल, वागविं मनिं ही उक्ती;
कर्तव्याचें क्षेत्र सुविस्तृत तुझियापुढतीं आहे !
अमित संकटें जरि उद्भवलीं,
धैर्यबलानें सोसुनि सगळीं
हळुंहळुं जाईं ध्येयाजवळीं—
चिंतुनि मजला जगतीं युवका ! सदैव विजयीं राहें ! "

( १० )

आनंदानें हृदय कोंदलें !
झर झर नयनीं अश्रुहि आले;
दृष्टि—किरण मम रुद्ध जाहले;
मधुर द्युतिची मूर्ति चिंतितां गुंगुनियां मी गेलों !
हळूंच मग मीं अश्रु वारिले;
नयन उघडुनी काय पाहिलें—
जिकडे तिकडे काळें काळें !
मधुर दृश्य तें उडुनी गेलें ! विस्मित अंतरिं झालों !

( ११ )

आशायुत मीं गगनिं पाहिलें,
मुख बालेचें क्षण लखलखलें;
तेजामाजीं विलीन झालें;
तेजहि गेलें, तीच चांदणी पुनरपि दिसली गगनीं.

दृश्यद्वय देखियलें नयनीं;
इंद्रजाल हें कसलें न कळुनि,
क्षणांत गेलों मूढचि बनुनी !
गेहामाजीं फिरुनि जाउनी स्वस्थ पहुडलों शयनीं !

( १२ )

प्रथम दृश्य ये नयनांपुढतीं
मेसुर काळीकभिन्न मूर्ती !
मदीय हृदयीं शिरतां भीती
रुचिर मनोहर मधुर दिसत मज मुखमंडल बालेचें !
" सदैव विजयी राहें जगतीं ! "
कर्णरंध्रिं हे रव दुमदुमती.
जाइ सकल मग विलया भीती.
गुंगत गुंगत गुंगवि मजला आलिंगन निद्रेचें !

हरीपूर, आक्टोबर १९१६.

## ९ हंसणारी कलिका

कोमल कलिके !
मोददायके !
बघतां तुजवरि प्रणय जडे,
झुलवित जगता,
मधुकरचित्ता,
हांसत संतत विहर, गडे ! १
तव हास्याचा
माधुर्याचा
निर्झर वाहवि अवनिवरी,

पिउनी पिउनी,
अवगाहोनी,
रिझविन संतत हृदय तरी. २

मधु आशेचा,
किरण सुखाचा,
पाहुनि तुजला जरि दिसतो,
हांस गडे ! तर
अशीच पळभर,
हास्य अंतरीं सांठवितों ! ३

मकरंदयुता
मधुर मुग्धता
खुलवी तुजला, मनरमणी !
सदैव सखये !
कलिका राहें,
सौख्यकिरण फेंकित भुवनीं ! ४

अमित सुखाचे
तव हास्याचे
गिरविन सखये ! मधुर धडे;
प्रणयी बनुनी
प्रणयी बनवुनि
प्रणया पसरिन चोंहिकडे. ५

पुणें, आगस्ट १९१६.

## १० उद्यानांत

शार्दूलविक्रीडित

ठेवोनी करसंपुटीं हनुवटी, विस्तारुनी लोचन,
हस्तीं घेउनियां सकौतुक सखी चाळी 'मनोरंजन',
शोभे केशकलाप कृष्ण कुरळा लोळे नितंबावरी,
लीलेनें पदरा हळूंच उडवी वायू, पुन्हां सांवरी. १
एकाकीं वळवोनि दृष्टि वरती साशंक चोहींकडे
पाही, होइ विचारमग्न फिरुनी चित्तास भ्रांती जडे;
खेळें हास्य मुखावरी क्षणभरी लाली कपोलीं वसे,
जाई सर्व लया क्षणांत वदनीं गंभीरता येतसे. २
ऐसें हें रमणीय दृश्य बघुनी संतोषले लोचन,
वाटे गोड किती गुलाबसुम हें, तल्लीन झालें मन.
येई प्रेमनिधान हें मम करीं, ऐसें मला वाटलें;
तोडोनी सुम एक मीं तिजवरी प्रेमादरें फेंकिलें. ३
'कोणीं हें' इतुकें वदोनि वळतां दृष्टीस दृष्टी भिडे,
होई संभ्रम अंतरीं, पुनरपी पाहे सखी भूकडे,
आनंदोनि झणीं हळूंच पुसिलें 'चिंता कशाची मनीं
उद्यानीं बससी म्हणूनि सखये ! एकीकडे येउनी'? ४
चोरूनी नयना वरी वळवुनी सप्रेम पाही मला,
जाई संभ्रम अल्पशा परिचयें ऐसें वदे प्रेमला.
'मूर्ती एक वसे अखंड हृदयीं ती चाळवी मन्मना,
काढाया बहुसाळ यत्न करितें, चित्तांतुनी जाइना!'५
'राहूं दे तिजला कुठेंच जगतीं थारा नसे राजसे !
सोडोनी नवपंकजासि अलिनें अन्यत्र जावें कसें ?

ज्याची मूर्ति वसे अखंड तुझिया हन्मंदिरा व्यापुनी,
भाग्याचा भुवनीं असे कवण हा सांगें क्षणीं भामिनी! ६
लज्जेनें मुखिं रक्तिमा पसरली, दृष्टी वळे भूवरी,
देहा कंप सुटे, तनूवरि उठे रोमांच, हो बावरी.
एकाकीं हंसली. हळूच वदली, 'साजे तुह्माला भलें,
राहोनी हृदयीं मलाच पुसतां, कोणी हृदा व्यापिलें ?७

*        *        *        *

आनंदें मन उल्लसे बघुनियां आशातरूला फलें
घेवोनी जवळीं हळूंच सखिला सप्रेम आलिंगिलें. ८

पुणें, आक्टोबर १९१६.

---

## ११ प्रेम आणि काव्य

पुससी मजला,
  कसें तुह्माला,
    वेड एवढें काव्याचें,
फोल कल्पना
  घोळघोळुनी,
    व्यर्थ मना कष्टविण्याचें ?   १
काव्याला जरि
  फोल मानिसी,
    काव्यकल्पना तव कोती;
जेथें जेथें
  प्रेम नांदतें
    तेथें काव्याची वसती.   २

दर्शनमात्रें
प्रेमल हृदयें
शिकविति काव्या परस्परां.
एक हृदय मग
दुजास होई
जगिं काव्याचा मधुर झरा. ३
तुझिया नयनीं,
अधरिं, कपोलीं,
काव्य खेळतें पाहून,
प्रेमल मूर्ती
तव ही गमली
मजला काव्याचें स्थान. ४
परिचय घडला
परस्परांचा
तेव्हांपासुनि मी स्वैर,
जनतेपुढतीं
काढुं लागलों
प्रणयी कवनांचे सूर. ५
प्रणयावांचुनि
दुजा न, रमणी !
गमे विषय मज काव्याला;
प्रणयगान मम,
प्रणयचि जीवन,
प्रणय जगीं अवघा भरला. ६

प्रणय रुचे तुज
जरी, सुंदरी !
काव्य केंवि मग नच रुचतें ?
मूर्त प्रतिभा
तूं काव्याची
असुनी, पुससी कां भलतें ? ७

पुणें,
जानेवारी, १९१७.

---

## १२ पिंजऱ्यांतील पोपटास

[ नेहमीं आनंदी वृत्तीचा परिचित पोपट पिंजऱ्यांत विषण्ण बसलेला पाहून. ]

( चाल–भूपती खरे ते. )

वद कष्ट कोणते होती तव हृदयाला,
कां विषण्ण दिससी स्वतंत्रतेच्या बाला ! १
नाचुनी निरंतर मंजु बोल वदणारा,
दुःखास कासया दिधला हृदयीं थारा ? २
स्वातंत्र्यहीन मी पुरें गड्या मज कळतें,
तुज खिन्न पाहुनी परि अंतर हळहळतें. ३
दुर्दैवि जन्मलों अश्रुसिंचनासाठीं,
लखलाभ आमुच्या अह्मांस त्या त्या गोष्टी. ४
स्वातंत्र्य लेंकरूं स्वच्छन्दें उडणारें,
मधुवातावरणीं सदैव बागडणारें; ५
तूं असुनी मग कां अश्रू नयनीं आले ?
मन उडुनि येथुनी सांग कुठें अडखळलें ? ६

कां मद्यापासुनी त्यजुनि अन्नपानास,
लावुनी शून्य ही दृष्टि गगनिं बसलास ! ७
म्हणि सांग, नको ! तव नयनीं सगळें दिसलें,
तव विषण्णतेचें कारण आतां कळलें. ८
ज्या गहन काननीं स्वच्छंदें फिरलास,
कां स्मरण तयाचें कष्टवि तव हृदयास ? ९
गिरिशिखरें हिरवीं, हिरवींपिवळीं रानें,
जीं पावन केलीं अपुल्या संभ्रमणानें; १०
नवलतिका कुसुमें गाढ गाढ तरुराजी,
विहरतां निरंतर परिचित तुजला जीं जीं; ११
तरुराजींमधल्या बाळपर्णींच्या केली,
आपुल्या निनादें कुहरें दुमदुमलेलीं. १२
ते तुझे संवगडी हिरव्या पोशाखाचे,
आणखी दुजे ते गायक सृष्टिसतीचे. १३
वरि विस्तरलेलें निळेंभुरें आकाश,
प्रणयाचे नाजुक वेगवेगळे पाश. १४
तो आम्रतरू चिरवासें प्रिय झालेला,
कीं पर्णभरानें सदैव जो फुललेला. १५
कोटरीं तयाच्या एक सानुलें घरटें,
जें हरिततृणानें तुवां नटविलें होतें. १६
हा ! हाय ! त्यांतला तव जीवाचा जीव,
प्रणयिनी लाडकी हृदयींचें राजीव. १७
तीं गोड चुंबनें आलाप प्रणयाचे,
ते लाडलाडके बोल मूक हृदयाचे. १८

विरहिणी तुजविणें केंवि कंठिते काळ,
जी सदैव ओढी अश्रुमण्यांची माळ. १९
तीं अनाथ दुबळीं दोन छबुकलीं बालें,
पंखही जयांनां पुरते नव्हते फुटले. २०
रक्षिता तयांना नाहीं तुजविण कोणी,
असतील पोरकीं वणवण हिंडत रानीं. २१
हें सकल आठवुनि जरि तूं विव्हल होसी,
मी खुळा ह्मणोनी उगाच पुसिलें तुजसी. २२
स्वातंत्र्य काय हें जया ठाउकें नाहीं,
मजसमान असलें पुसती कांहींबाही. २३

हरीपूर,
मे १९१७.

---

## १३ निरोप

[ फर्ग्युसन कॉलेजमधून बाहेर पडतांना माझ्या सर्व बंधुभगिनींना निरोप ह्मणून ही कविता लिहिली. ]

( १ )

हांसत खेळत संगें अपुल्या मी असतां,
रिझवुनि मम हृदयाला सुखकर जो झाला,
निर्मल आनंदाचा उत्सुक प्रेमाचा,
प्रिय बांधवभगिनींनों, काल अतां गेला.

( २ )

"कविता" मम हृदयाची सोनुकली बाला
सोडियली विहराया मी अपुल्यांमध्यें,

सुंदर ती मुळिं नसतां तिजला प्रेमानें
गोंजारुनि, दावियलें अतुल प्रेमाला.

( ३ )

हा तुमचा मजवरचा निर्हेतुक लोभ
लाविल संतत चटका माझ्या हृदयास.
त्या त्या प्रेमळ मूर्ती ते मधुरालाप
ठेविन खोदुनि स्मृतिच्या पटलावरि खास.

( ४ )

परिचित पुरती तुह्मां मम 'कविताबाला',
पुढती तिचियासंगें नच मी येणार.
ठेवियलें मजवरती जें तुह्मीं प्रेम,
त्या प्रेमें सांभाळा! माझ्या छबुलीला.

हरीपूर, जून १९१७.

---

## १४ सांत्वन

"Music, when soft voices die, vibrates in the memory."
—*Shelley.*

गाढ अनंतोदरीं
गान निमालें जरी,
स्मृतिपटलावरि स्वैर विहरती मधुर गानलहरी! १
सृष्टीचें छकुलें
सुमन जरी सुकलें,
दरवळलेला परिमल झुलवित ने हृदया वरिवरी! २

दिव्य मधुर बाला
हंसणारी चपला,
क्षणिं लोपे, परि मागुति विलसे दीप्ती गगनावरी! ३
दुर्दैवें अपुला
वियोग जरि घडला,
तुजविषयींचे तरंग हृदयीं वसतिल चिर सुंदरी! ४

पुणें, फेब्रुआरी १९१७.

---

## १५ ध्यास

मेघजलास्तव तृषार्त चातक गगनीं गरगर फिरणारे,
दैवबलें तें कुणा लाधलें कितीक त्यावांचुनि मेले!
विषण्ण होउनि ह्मणुनि कधीं कां चातक विसरे मेघाला?
ध्यास लागला जो हृदयाला कधीं न सुटला कोणाला. १
उदधींमधले अमित शिंपले स्वातीच्या वर्षावांत,
बिंदु एकतरि मिळेल ह्मणुनी वदन पसरुनी बसतात;
किती प्रसवती सुंदर मोंतीं, रितेच मरती किती तरी?
ह्मणुनि सोडिलें कधीं तयांनीं ध्येय आपुलें आजवरी? २
चंद्रकलेला सदा भुकेला चकोर झुरतो तिजसाठीं,
तनमनधन तिज अर्पुनि लावी संतत गगनावरि दृष्टी;
तिला चुंबणें भाग्य कुणाचें फुकेच वेडे कितीतरी,
ह्मणुनि चकोरा कधिं सुटला कां ध्यास तियेचा आजवरी? ३
उज्ज्वल तारा रोंखुनि नयनीं स्वीकारियला जो पंथ,
त्याच पथानें किती मिळाले स्वर्गसुखाला जगतांत!

कितीक फसले असतिल मागें, पुढती फसतिल कितीतरी !
गोड मनींचा ध्यास सोडणें शक्य नसे मज युगांतरीं ! ४

मुंबई, जुलै १९१७.

---

## १६ 'दावा मजला कोणितरी !'

नील नील नभसरोवरीं
चंद्रकलेसह केलि करी,
नक्षत्रांची गोड सहचरी दावा मजला कोणितरी. १

कृष्णवर्ण घनपटावरी
बिजलीसह चमचमणारी,
पवनझुल्यावर झुकणारी ती दावा मजला कोणितरी. २

उंच उंच हिमनगशिखरीं
रविकिरणांसह हंसणारी,
चराचराला हांसविणारी दावा मजला कोणितरी. ३

गार गार हिरवळीवरी
हरिणशिशू खेळविणारी,
दंवबिंदूंना गुंफणारी ती दावा मजला कोणितरी. ४

कमलदलावरि खुलणारी
फुलवेलीवरि फुलणारी,
उधळित हर्षा संचरणारी दावा मजला कोणितरी. ५

अचेतना चेतविणारी
काव्यस्फूर्ती देणारी,
अंतरसूत्रा खेळविणारी दावा मजला कोणितरी. ६

मुंबई, जुलै १९१७.

---

## १७ माझी बांसरी

[ चाल—उद्धवा शांतवन. ]

मम जन्मापासुनि होती, मजजवळ बांसरी मधुर.
वादन जरि अवगत नव्हतें, वाजविली संतत स्वैर.
जरि मधुरालाप निघाले,
कीं कठोर बांसरि बोले;
बालपणीं मज नच कळलें,
वाजवीत फिरणें एक, नच दुजें मला ठाउक. १
हळूहळू अमित सौख्याचे, कीं स्वैर स्वातंत्र्याचे,
झर झर झर झर झर गेले, दिन माझे बालपणाचे.
मज कळूं लागलें सगळें.
जरि कठोर बांसरि बोले;
तें असह्य मजला झालें,
अनुभव जो सुखदुःखाचा, नव्हता तो मजला आला. २
बांसरी मधुर छेडाया, जरि कोणि मला शिकवीलें,
समजेन तयानें माझें, जगिं जीवनसार्थक झालें;
आलाप मधुर काढोनी,
अणि दुःख लया नेवोनी;
पसरीन प्रमोदा भुवनीं,
होणार कसें परि सगळें, हे तरंग मानसिं आले. ३
शेवटी क्षणिक सौख्याचा, सुदिन तो एकदां आला;
चाललों उषासमयास, मम मानस रिझवायाला;

रमणीय कोणि उद्यानीं,
गुंफीत फुलांची वेणी;
बैसली जणुं उषारमणी,
बांसरींत आपोआप, उद्भवले मधुरालाप. ४
इतुक्यांत सहज रमणीनें, निज नयन वरी वळवीले,
क्षणमात्रचि गरगर फिरुनी, भूवरी पुन्हां ते वळले;
त्या क्षणांत सत्वर सगळे,
तालसूर मजला कळले,
बांसरींत ते वाजविले;
अननुभूत खळबळ कांहीं, उद्भूत मानसीं होई. ५
फिरफिरुनि स्वैर वाजविलें, हृदयाची तृप्ति न होई,
वादना जिनें शिकवीलें, ती मूर्ती मानसिं येई;
अवलोकाया ती रमणी,
पातलों फिरुनि उद्यानीं;
गुंफीत फुलांची वेणी,
ती तशीच होती बसली, लावण्यदेवता गमली. ६
जाउनी तियेच्या जवळीं, मी हळूंच वदलों तिजला,
वादना मजसि शिकवीलें, उपकार फार हा झाला;
सस्नेह विमल हे नयन,
मजवरी पुन्हां रेखून,
शिकवी मज मंजुल तान;
ऐकुनियां विस्मित होई, ती वदे मला लवलाही. ७
पातलें कोण देखाया, नयनांसि वरी वळवीलें;
आपणांसि वादन कसलें, केव्हां मी नच शिकवीलें;

परपदांबुजांची दासी,
आपणांवरी नयनांसी
रेखावें; नीती कैसी;
नयनीं जरि कांहीं दिसलें, विसरुनि तें जावें सगळें. ८

कथिलें जें तें तें घडुनी, बहु काळ लोटला आतां;
परि सगळें आतां घडलें, ऐसें मम भासे चित्ता;
त्या नयनीं जें शिकवीलें,
आठवूनि तें तें सगळें,
चिरकाल जरी चिंतियलें,
अति कठोर बेसुर वाजे, बांसरी पुन्हां वाजवितां. ९

आलाप मधुर उमटावे, बहु यत्न ह्मणुनि मीं केले;
कीं उपाय पुसतां वदती, मोडकी बांसरी सगळे;
तिजवरती आशा सगळी,
मोडकी जरी ती असली,
होईल पुन्हा कां तसली?
वदतां मज ह्मणती सारे, 'बांसरी दाखवीं आह्मां.' १०

बांसरी दाखवीं ह्मणतां, मी तयां दावुं कोठून?
हृदय ही बांसरी माझी, कीं दावुं देह उकलून!
ते मधुरालाप निमाले,
कोठेंच्या कोठें गेले,
स्मृतिशेष मात्र ते झाले,
बेसूर बांसरी झाली, विझली मम आशा सगळी. ११

सकलहो ! बांसरीवाले, सरसावा सगळे या या;
मोडकीतोडकी माझी, बांसरी पुन्हा जुळवाया;
हें कार्य सुदुस्तर ह्मणुनी,
कीं द्याल जरी सोडोनी,
वाजवीन डंका भुवनीं;
बांसरी घेउनी सगळे, हे उगाच ओझेवाले. १२

हरिपूर, आक्टोबर १९१७.

---

## १८ एकच क्षण

[ दैवगतीनें कायमची ताटातूट झालेल्या दोन विरही जीवांना एकमेकांच्या अकल्पित ओझरत्याच दर्शनानें होणाऱ्या सुखाची कल्पना प्रेमी जीवावांचून इतरांना कशी होणार ? ]

ओझरता भिडतां नयनाला प्रीतीचा दुसरा नयन,
क्षणमात्र स्वतःला विसरोनी सौख्यावरि खुलला प्राण. १
तोंवरी जिवाला कवळोनी शून्यता स्वस्थ जी होती,
दिपुनियां सुखाच्या तेजानें तत्क्षणीं दूर सरली ती. २
बसतांच विजेचा हा झटका तटतटा बंधनें तुटलीं,
सोडुनी जिवाला जातांना भेसूर निराशा हंसली. ३
दचकला जीव परि झणिं सुटला अवगणुनि हास्य भेसूर,
फडफडा पंख निज फडकोनी सुखगगनिं उडाला स्वैर. ४
"सौख्यांत दंगुनी असतांना जगिं कोण पाहतें मागें ?"
क्षणएक तेवढा सरतांना जीवास ओढणी लागे. ५
सौख्यांत सदोदित उडण्याची वासना मुळीं नच पुरली;
ओढिते निराशा जरि मागें, उतरे न जीव परि खालीं. ६

वांसुनी चोंच जरि आशेची–पांखडे पंख कितितरी,
परि फोल जाहले यत्न सकल, आदळे पुन्हां भूवरी. ७
शून्यता हंसत ये जवळीं,–कवळुनी धरी जीवाला,
पाहतां पाहतां विरहाचा–पिंजरा भोंवतीं बसला. ८

*　　*　　*

पिसळला जीव, किति तडफडला, तोडण्यास पाहे पाशा,
ध्वनि उठे "वेडप्या जीवा रे ही खुळी मानवी आशा!" ९

हरिपूर, नवंबर १९१७.

---

## १९ परीक्षेचा बळी

### एक समाजदृश्य

घोर घोर अंधार चहुंकडे समय मध्यरात्रीचा,
ऐशा समयीं उमटत नव्हता कोठें रव कोणाचा. १
तृणपर्णांतुनि कुणी जिवाणू थबकत सरपटणारे,
गर्दतरूंच्या पानांमधुनी घुमघुमणारे वारे, २
रातकिड्यांची किरकिर कोठें कुठें कुई कोल्ह्यांची,
यांच्यावांचुनि भंगत नव्हती शांति कुठें विश्वाची. ३
रम्य शांतिनें ऐशारीती नटली असतां सृष्टी,
निद्रावश जीवास मुळींही दाद कशाची नव्हती. ४
कष्ट करोनी दिनभर कोणी थकवोनी देहाला,
प्रशांत समयीं सेवित होते निद्रेच्या सौख्याला. ५
स्वप्नसृष्टिच्या सुरम्य देशीं संचरतांना कोठें,
सौख्यमनोरे तऱ्हेतऱ्हेचे कोणी बांधित होते. ६

प्रणयमंगलें कुणि नटलेले सेवित अधरसुधेला,
सौख्यमग्न ते नकळत होते झाले वश निद्रेला. ७
असे सुखाचे पुतळे कितितरि सेविति निद्राशांती;
दुःखित जीवां परि निद्रेची जाणिव मुळिंही नव्हती. ८
गाढगाढ जरि तिमिर पसरला एका माडींतून,
मंद दिव्याचीं तिरपीं किरणें चमकति तिमिरांतून. ९
चला, चढा पाहुंया कोण हा दुःखानें पिडलेला,
रात्र उमटली परि अद्यापी जागृत कां हा ठेला. १०

* * *

माडि चौखणी प्रशस्त होती नवीच रंगविलेली,
सुधारणेच्या उपकरणांनीं सुंदर भूषविलेली. ११
स्वच्छ रुजामा कपाट खुर्च्या मेज वर्तुळाकार,
मेजावरती दीप लोंबता सुंदरसा "डिटमार." १२
नानापरिचीं मोहक चित्रें, किती युवायुवतींचीं,
किति देखावे नयनमनोहर, दृश्यें किति सृष्टीचीं. १३
सुरम्य सारें, परि कोणाला? आनंदी हृदयाला;
चिंता जाळी सदैव ज्याला काय अशांचें त्याला? १४
माडींमाजीं साचिंत होता युवक एक बसलेला;
सौख्य तिळभरी या सकलांचें नव्हतें त्या युवकाला. १५
पूर्ण खिन्नता वदनीं होती शून्य तयाची दृष्टी,
फिरे गरगरा क्षणीं चहुंकडे क्षणीं खिळे भूवरती. १६
स्तब्ध होउनी क्षणभरि राहे मानसिं चिंतित कांहीं,
क्षणांत फिरुनी खिन्न तयाची मुद्रा भेसुर होई. १७

क्षणभर बैसे, क्षणांत उठुनी हळूंच चालूं लागे,
क्षणांत पाही वरती–खालीं–इकडे–तिकडे–मागें. १८
क्षणोक्षणीं हृदयांत माइना दुःखाचा उन्माद,
शब्दमिषें जणुं दुःख उमटलें फोडुनियां हृद्बंध. १९

* * *

" हाय ! अभागी नसेल दुसरा मजसम जगतीं कोणी,
'दुर्दैवी हा' ह्मणुनि वदावें मजला ज्यांनीं त्यांनीं. २०
अभ्यासास्तव अन्नपानही अवगणुनी समयास,
उठतां बसतां सदा घेतला अभ्यासाचा ध्यास. २१
देह शिणविला, हृदय शिणविलें, जागुनि रातोरात,
घोकघोकिलीं किती पुस्तकें कितीक नोटा पाठ ! २२
अभ्यासी हा हुशार ह्मणुनी स्तुती जगानें केली,
दुर्दैवाचा एक तडाखा–दृष्टि जगाची फिरली. २३
निकाल झाला–होणें झालें–घोर निराशा झाली,
क्षणांत दुसऱ्या या जीवाची कवडी किंमत ठरली. २४
हंसुनी वदती उनाड, यानें यत्नहि केला नाहीं,
तुच्छपणें मज पाहुनि वदती कोणीं कांहींबाहीं. २५
असो जगाचें–परी जयांनीं जन्म दिला मज जगतीं,
मातापितरें मला पाहुनी दुःखीकष्टी होती. २६
पिता वदतसे 'लाज वाटते पुत्र तुला ह्मणण्याला'
प्रेमळ जननी अश्रु ढाळितां घरे पडति हृदयाला ! २७
दुःख देउनी परास जगणें होउनियां भूभार,
लाजिरवाणें जीवन नेणें, नाहीं मज रुचणार. २८

नसे सुखाशा लवही आतां, जगीं कुणास्तव जगणें,
आजपासुनी इहलोकीचें सरलें देणें घेणें !"

*   *   *

इतुकें वदुनी स्तब्ध जाहला फिरुनि शांतता आली,
जाइ खिन्नता, पूर्ण करारी मुद्रा त्याची झाली.
फिरुनि वदे तो " स्वैर जगानें कांहींही बोलावें,
प्रयत्न केले अथवा नाहीं, परमेशाला ठावें. ३१
करणें केलें–होणें झालें–घडणें कोणाहातीं,
कर्तव्याला करुनी मरतों ह्मणुनी जीवा शांती. ३२
असो जगा हा प्रणाम तुजला तुजवरच्या जीवाचा,
तुझ्याच पायीं मरणाराचा–एका हतभाग्याचा." ३३
ह्मणुनी उठला, उठतांना तो सहजीं वरती पाहे,
कडी लोंबती लोखंडाची कडिपाटावरि आहे. ३४
हंसुनी वदला " साहाय्य मजला पुरतें परमेशाचें,
ह्मणुनि सुदैवें सहज गवसलें द्वारचि यमसदनाचें." ३५
दोरखंड घालुनी तयावरि करी तयाचा फांस,
कंपित होई हस्त क्षणभरी कंप न परि हृदयास. ३६
मेजावरती हळूंच चढला, फांस घेतला हातीं,
" येतों–बाबा–आई !" ह्मणुनी घाली मानेभंवतीं. ३७
थरथर कांपे दीप, थरथरा कांपे सगळी सृष्टी,
वारा थरथर कांपुं लागला, विझली दीपज्योती. ३८
धडपड घरघर केवळ क्षणभर सकल जाहलें शांत,
परी जगाला काय तयाचें, जग होतें निद्रेंत. ३९

*   *   *



अनुक्रम २६०४७ ... ९२७०५ ... ३१३/९१५

" हाय! अभागी मरुनी गेला फुका परीक्षेसाठीं,
काय परीक्षा हीच कसोटी कर्तव्याची जगतीं? ४०
अभ्यासानें शरिर झिजावें, घोकुनि फुटते छाती,
'शब्द एकला' परी तयानें व्हावी सगळी माती. ४१
'पास एवढा शब्द' ऐकतां भूल जनाला पडते,
दुर्दैवी अपयशी जनाची कवडी किंमत होते. ४२
वर्षोंवर्षें घोकघोकुनी सांचविलेला ठेवा,
क्षणिक कसोटी लावुनि सगळा तुच्छ जनीं लेखावा. ४३
न्याय कोठला? कुठें चालतें जग सगळें न्यायानें?
दृष्टी फिरते जशी जयाची तसें भकावें त्यानें. ४४
परी समाजा! तुला भोंवते ही जनतेची दृष्टी,
किती गळालीं अशाच पायीं अमोल माणिकमोतीं! ४५
ऊठ! ओरडें! कंठरवानें सांग जगाच्या पुढतीं,
"'मुळांत अमुची परीक्षणाची चुकते सगळी रीती!"४६

हरिपूर, मे १९१८.

---

## २० 'हृदयाचें गान'

ठेवुनि मस्तक हृदयीं, देउनियां श्रवण,
ऐक गडे! ऐक जरा 'हृदयाचें गान.'
पुसशिल मज 'तान कुठें? ताल कुठें? सूर कुठें?'
तान, सूर, ताल सकल उठतिल त्यांतून.
ऐक गडे! ऐक जरा 'हृदयाचें गान.' १

आजवरी मम हृदयीं खेळत जी होती
प्रेममयी ही सखये ! मोहक तव मूर्ती;
हांसत अजि जवळिं उभी तुजला पाहून
मोदलहरि सळसळती मम हृदयांतून.
लहरींच्या नर्तनांत उमजुनियां तान,
ऐक गडे ! ऐक जरा ‘ हृदयाचें गान.’ २
सौख्याच्या तारांचें नाजुकसें जाळें
आहे हृदयीं माझ्या सखये ! विणलेलें;
प्रणयाचा मंद अनिल फिरतां त्यांतून.
झंकारांतुनि उमटे अस्फुट मधु गान.
तान, सूर, ताल सकल त्यांतच मानून
ऐक गडे ! ऐक जरा ‘हृदयाचें गान.’ ३
जीं जीं प्रेमल हृदयें असती या जगतीं
आत्मानंदीं रंगुनि सकलहि गाताती;
साथ दुज्या हृदयाची जरि लाभे त्यांना
संगीतांतुनि उठती तानावरि ताना;
थोर भाग्य मम, ह्मणुनी लाभ तुझा झाला,
हृदय दुजें सांपडलें विरही हृदयाला.
नयननिपातें मजला संतत सुखवून,
ऐक गडे ! ऐक सदा ‘ हृदयाचें गान. ’ ४

मुंबई,
सप्टेंबर १९१८.

---

## २१ हंसणाऱ्या बालिकेस.

( १ )

अहहा ! मूर्त तूं स्वतंत्रता,
कां बालपणींची मोहकता ?
लहरी अससि कां पवनाची,
स्वर्गीय वातावरणाची ?
बिजली ढगावरि लकलकती,
उतरोनि आलिस या जगतीं ?
अथवा नभींची सुरबाला
जगतांत उधळिसि हास्याला ?
हंसऱ्या गुलाबा पाहून
हंसणार नाहीं जगिं कोण ?

( २ )

हंसतां पाहुनी तुज, बाले !
नैराश्य क्षणभरि मावळलें.
दुसऱ्यास हंसतां पाहोनी,
जीवास घ्यावें रिझवोनी,
क्रम हा जयांच्या नशिबाला
विधिनें अखंडित लिहिलेला;
त्यांतील हा मी हतभागी
विनवीं ह्मणोनी तुजलागीं.
अशि हांस ! सदोदित हांस गडे !
हुरळोनि जाई मन वेडें.

( ३ )

पुतळी उजळल्या नशिबाची,
प्रतिमा मूर्त तूं सौख्याची;
ह्मणुनी गमे हें जग तुजला
पेला सुखानें भरलेला.
तरले ! सदोदित त्यांतून
आकंठ करिं तूं सुखपान.
मनसोक्त फिरणें, बागडणें;
हंसुनी जगाला हंसवीणें;
तुझिया निरंतर या लीला
रिझवोत कधी जीवांला.

( ४ )

गमतें तुला सुखभांडार,
जग हा मुलामी बाजार.
दिसतें इथें जें सुख कांहीं
झिलई सुखाची, सुख नाहीं.
आशा ह्मणोनी कवळावी,
हृदयास जाळित ती जावी !
हृदयें परस्पर जीवांचीं
थडगीं सुखाचीं प्रेमाचीं.
रीती जगाची उफराटी,
तुजला नको ती अनुभूती.

( ५ )

भेसूर जगाच्या तिमिरांत
तारा तुझ्यासम हंसतात.
किरणें सुखाचीं फेंकोनी
तिमिरास देती उजळोनी.
जगतांत तुमच्या तेजबळें
भिउनी निराशा दूर पळे.
ह्मणुनी जगींचा हा वास
क्षणमात्र हंसवी आह्मांस.
न तरी कशाचा आधार
विटल्या जिवांनां होणार ?

( ६ )

अहहा ? प्रभेची तूं मूर्ती,
आशाच दुसरी या जगतीं.
कितिही जरी मी तुज पाहीं,
तृप्ती जिवाला मुळिं नाहीं.
होशील मम कां कोणि तरी ?
मैत्रीण–भगिनी–शेजारी !
मग या विषारी जगताची
पर्वा कशाला कोणाची ?

हरीपूर,
मे १९१८.

( ५ )

भेसूर जगाच्या तिमिरांत
तारा तुझ्यासम हंसतात.
किरणें सुखाचीं फेंकोनी
तिमिरास देती उजळोनी.
जगतांत तुमच्या तेजबळें
भिउनी निराशा दूर पळे.
ह्मणुनी जगींचा हा वास
क्षणमात्र हंसवी आह्मांस.
न तरी कशाचा आधार
विटल्या जिवांनां होणार ?

( ६ )

अहहा ? प्रभेची तूं मूर्ती,
आशाच दुसरी या जगतीं.
कितिही जरी मी तुज पाहीं,
तृप्ती जिवाला मुळिं नाहीं.
होशील मम कां कोणि तरी ?
मैत्रीण–भगिनी–शेजारी !
मग या विषारी जगताची
पर्वा कशाला कोणाची ?

हरीपूर,
मे १९१८.

# २२ युरोपीयन मुलास पाहून

दिंडीवृत्त

सहज संध्यासमयास एकदां मी
फिरायास्तव जाहलों मार्गगामी,
पुढें पाहुनि मैदान मोकळेंसें
सहज मजला वाटलें बसावेंसें. १
तिथें खुलणाऱ्या गार हिरवळीनें,
तिथें फिरणाऱ्या शीत मारुतानें
चित्त झालें तल्लीन शीण गेला,
मुंबईचा क्षणमात्र विसर झाला. २
युरोपीयांचीं गौरवर्ण बालें
स्वैर फिरतांना बघुनि हृदय धालें;
हातगाड्याभोंवतीं किती होतीं,
किती कंदुकक्रीडेंत मग्न होतीं. ३
दुज्यावरती फेंकिती कुणी कांहीं,
कुणी दावी वाकुल्या हंसत राही;
धाक दावी जरि कृष्णवर्ण दाई,
परी भीती तिळमात्र यांस नाहीं. ४
जन्म ज्यांचा स्वातंत्र्य भोगण्याला,
आजपासुनि हा धडा सुरू केला,
पुढें ज्यांना अधिकार भोगण्याचा,
दाब त्यांच्यावरि कसा बसायाचा ? ५

विविध असले मनिं चालले तरंग,
पदाघातें जाहली शांति भंग.
वळुनि पाहें जों जवळिं कोण आलें,
गौरवर्णाचें बाल पाहियेलें. ६
केश सोनेरी, नेत्रयुगुल नील,
गुलाबाच्या सम ओष्ठ, गाल लाल,
स्वच्छ सुंदर पोशाख नेटकासा,
गौरवर्णी मज बाळ दिसे खासा. ७
स्नेह उपजे पाहुनी बालकास;
गोंजरावें उपजली मनीं आस.
बाळ कोणाचा येत झणिं विचार,
मनीं दचकुनि सरकलों जरा दूर. ८
मौज बाळा वाटली पाहुनीयां,
गोड हंसलें लागलें जवळिं याया,
भीति गेली खुणविलें ये म्हणोनी,
निकटि आलें हांसलें मज बघोनी. ९
मला पाहुनि बावरी होइ दाई,
हांक मारी, परतुनी बाळ जाई;
बाळ गेलें, शांतता फिरुनि आली,
विचारांची मालिका सुरू झाली. १०
'दीन पाहोनी हिंदवासियाला,
हंसें आलें कां गौर बालकाला?
काय अथवा निष्पाप शिशुपणींचें
हास्य होतें तें सहज बालकाचें? ११

वृथा पहिली कल्पना मनीं येते,
खरी दुसरी तें हास्य सहज होतें;
"हंसुनि हंसवीणें" कार्य हें जयांचें,
कपट ठावें त्या बालकांस कैचें? १२
सान असतां न कळतें जगीं कांहीं,
द्वेष, मत्सर वा दुजा भाव नाहीं,
असो परका कीं आपुलाच कोणी,
काय बालांना, सारखेच दोन्ही. १३
निसर्गाच्या लाडक्या लडीवाळा !
व्यर्थ दिधला मी दोष तुला बाळा !
कळे तुजला कोठला दुजाभाव,
हृदयिं तुझिया पापा न मुळीं ठाव. १४
तुझ्यापासुनि बालका ! निघुनि जातां
सांगणें हें तुज एवढेंच आतां;
वयें जेव्हां येशील पूर्णतेला
वृत्ति राहूंदे अशी तुझी बाळा !' १५

मुंबई,
आक्टोबर १९१८.

---

## २३ शुभमंगल ! सावधान ! !

### एक समाजदृश्य

( चाल—चंद्रकांत राजाची. )

चैत्रमास संपुनी पातले दिन वैशाखाचे,
आनंदाचे, मांगल्याचे, लगिनसराईचे. १

चराचरावरि खुलवटणाऱ्या वसंतबहरीला,
मांगल्याची जोड मिळे, मग पार न मोदाला. २
नगरवीथिकेवरुनी जातां फिरतां उद्यानीं,
मंगल विलसें, जिकडे तिकडे मंगल ये कानीं. ३
जवळीं जवळीं येत चालला मुहूर्त लवलाही,
ह्मणुनि उडाली घरांत कुठल्या, लग्नाची घाई. ४
सायंकाळीं मुहूर्त यास्तव, हंड्या झुमरांनीं,
सुरम्य मंडप कुणीं थाटला गुढ्यातोरणांनीं. ५
झगझग करिती दीप विजेचे चित्रवर्ण माळा,
घेउनि अक्षत कुणी चालले नगरदेवतेला. ६
नरनारींनीं मंडप खचला—बँड कुठें वाजे,
" मंगल—मंगल—सावधान " हा ध्वनी कुठें गाजे. ७
अश्वावरती वधुवर शोभति मागुनि जन सगळे,
वाजत गाजत वरात कोठें नगरांतुनि चाले. ८
किति वर्णावें आनंदाचे प्रकार हे फार,
मंगलकालीं जिकडे तिकडे मोदच दिसणार. ९
ह्मणतों परि हें उलटें कितिदां अनुभवास येतें,
मंगल दिसतें—परी अमंगल अंतीं तें ठरतें. १०
मंगलतेचा वरुनि मुलामा आंत परी काय,
कसाबकरणी किती चालते या जगतीं, हाय ! ११
असो ! रम्यशा सायंकाळीं सहजीं फिरतांना,
कर्णपथावरि हळूंच आल्या सनईच्या ताना. १२
श्रवण गुंगले, हृदय ओढलें, पद तिकडे वळले,
आलापांच्या अनुरोधानें तसाच मी चालें. १३

जाऊनि पाहें—वाजंत्र्यांचा संच उभा द्वारीं,
सुरेल सनई छेडित ताना त्यांच्यामाझारीं. १४
गर्दी जमली जो तो पाहे आंत शिरायास,
शिरकायाला मुळिंही थारा मिळे न कोणास. १५
द्वाराजवळीं राहुनि येथें लव न दिसायाचें,
आंत घुसा; पाहुंया चाललें मंगल कोणाचें. १६

*     *     *

सुममालांनीं, नवदीपांनीं सुरम्य सजलेला,
मंडप होता नरनारींनीं चिकार फुललेला. १७
कुठें पुणेरी पगडी—कोठें रुमाल जरिकांठी,
नटुनी थटुनी जमली होती व्याह्यांची दाटी. १८
भली दक्षणा मिळेल ह्मणुनी खात मनीं मांडे,
जमले होते तिथें भटांचे तांडेच्या तांडे. १९
पांघरुनी भरजरी दुपेटे शाल्ह नेसोनी,
दुसरी बाजू होती भरली हर्षित रमणींनीं. २०
कसें बोहलें श्रृंगारियलें वर वरती बसले,
दृष्टी जातां परी थरथरा काळिज थरथरलें ! २१
सुरकुतलेला देह, पहा हीं गालफडें बसलीं,
अंधुक दृष्टी कुठें दडाली भालाच्या खालीं. २२
समाधान राक्षसी तयाच्या मुखावरी विलसें,
वदनाचें बोळकें ह्मणुनि हें मधुनिमधुनि हांसें. २३
वर कसला हा—मृत्यु मूर्त जणुं मंडपांत आला,
कलंक अथवा मंगलतेच्या मंगल नांवाला. २४

काय आंधळे पगडीवाले, हे भोजनभाऊ,
दोष कशाला तयांस, नुसते हे साखरखाऊ. २५
पिता तिचा परि अदय कसा हा उलथ्या हृदयाचा,
मूर्त मृत्युला बळी अर्पितो अपुल्या कन्येचा. २६
वरा पूजितां ढळढळ रडते कन्येची आई,
परि आनंदी मुद्रा याची, चाड तया नाहीं. २७
"घटका भरली," जोशिबुवांनीं पुकार हा केला,
परि कोणाची, कसें कळावें तांदुळउपथ्याला. २८
बळी आणिला खेंचुनि तेथें पीतवसनधारी,
उकळ्या फुटल्या वरराजांच्या हृदयामाझारीं. २९
दीन तनुलता थरथर कांपे, अश्रू टपटपती,
अबला रडते पाहुनि अपुल्या जन्माची माती! ३०
अंतरपट लागला, गरजलें 'सावधान' तेथें,
मंगलाक्षता चहुंबाजूंनीं जन फेंकित होते. ३१
वधूवरांचें अखंड मंगल ! हृदयीं चिंतोनी,
मंत्रघोष उठविला द्विजांनीं, भोजनभाऊंनीं. ३२
साखर सरली, विडे संपले, दक्षिणाहि झाली,
गर्दी हटली, सर्व मागुती घरोघरीं गेलीं ३३

*   *   *   *

लगिन संपलें, साखरखाऊ हळूंहळूं गेले,
कोणासाठीं मंडप अजुनी " सावधान " बोले! ३४
स्तंभ बोलती "सावधान" तें, दीप तेंच बोले,
मृदुल सुमांच्या मालांमधुनी 'सावधान' उठलें! ३५

बोहोल्यावरि विजयश्रीनें खाटिक नटलेला,
उद्देशुनि हें असेल सगळें "सावधान" त्याला. ३६
होय ! थेरड्या ! तुझ्याचसाठीं मंडप ओरडतो,
ध्वनी दुमदुमे "सावधान" जो तुझ्याचसाठीं तो. ३७
पाजळुनी तूं सुरी कसाया ! आज सुवर्णाची,
मान चरचरा कांपिलीस कां गरीब गाईची ? ३८
क्षणोक्षणीं तुज सोडुनि जाया पाहतसे जीव,
तुला पाहिजे कशास आतां विषयाची हांव ? ३९
क्षणिक सुखाचा लोभ नावरे, त्या लोभासाठीं,
परकन्येच्या सुखांत दुष्टा कालविली माती ! ४०
अश्रुमाळ ती ओढिल आतां तुझिया नांवानें,
या करणीचीं कुठें लांडग्या ! फेडशील पतनें ? ४१

*    *    *

" कांचनभटजी " लपसी कोठें घेउनि मुख काळें,
तुझ्याचसाठीं मंडप बघ हा 'सावधान' बोले. ४२
द्रव्य देउनी खाटिक मागे गाय चिरायास,
कशी निष्ठुरा ! नेलिस तिजला त्याच्या गेहास ! ४३
देखत तुझिया सुरी चकाके मानेवरि तिचिया,
पाझर कैसा फुटला नाहीं अदया तव हृदया ? ४४
हंबरडा फोडुनी सुरीला गाय बळी पडली,
तुझ्याचपायीं तिच्या सुखाची रांगोळी झाली ! ४५
हाय ! माउली ढळढळ रडते कन्येची माता,
सांत्वन उरलें तिला कशाचें या जगतीं आतां ? ४६

निज कन्येच्या संसाराची पाहुनियां माती,
रडतांरडतां, अश्रु ढाळितां सांडिल जीवा ती. ४७
कारण याचें तूंच ! निष्ठुरा ! दया तुला कुठली ?
मानव कसला ? राक्षस अससी मनुजरूपधारी ! ४८

* * *

अहो उपाध्ये ! मंत्रगुरू ! हें सावधान ऐका,
ओरडुनी हा मंडप तुम्हां मारितसे हांका. ४९
कुठें वंद्य ते गुरुमंत्रांचे खरे वेदमूर्ती ?
पैशासाठीं मंत्रविके तुम्हि केवळ पोटार्थी. ५०
तळतळाट किति पदरीं घेतां काय तुम्हि त्याचें,
पिढ्यापिढ्यांचे दलाल तुम्ही या बाजाराचे. ५१
एक थेरडा विवाह करितो विषयसुखासाठीं,
मंगलविधिनें तुह्मीं बांधितां जन्माच्या गांठी. ५२
खडसावोनी अजुनी कोणी नसे तुह्मां पुसता,
ह्मणुनी ऐशी विटंबना कां मंत्रांची करितां ? ५३
मंत्रगुरू ह्मणवितां—खरे व्हा मंत्रगुरू अजुनी,
'सावधान' हें अखंड तुमच्या दुमदुमुंदे कानीं. ५४

* * *

सावधान हें तुझ्याचसाठीं असेल कां अबले !
गरिब गाइला मंगल कसलें ? सावधान कसलें ? ५५
सुरी चमकते, उरांत घुसते, काळिज चरचरतें,
परी जगाच्या दृष्टीनें तें मंगलमय ठरतें. ५६
स्वार्थासाठीं जनक लोटितो ज्यांना खाईंत,
किती तुझ्यासम अनाथ भगिनी असतिल दुःखांत. ५७

पिता सुखावरि घाव घालितां अदय कुऱ्हाडीचा,
गरिब गाइनों ! बोलायाला नाहिं तुह्मां वाचा. ५८
विक्रय होतां परक्या गेहीं निमुटपणें जाणें,
अमंगलाला मंगल मानुनि रडत जीव नेणें. ५९
दुर्दैवानें तेंच विधीनें तव भालीं लिहिलें,
अनाथ भगिनी ! मंगल आतां जगतीं तुज कुठलें? ६०

* * *

ऊठ समाजा ! बधीर झाले कैसे कर्ण तुझे ?
तुझ्याचसाठीं अजुनी येथें 'सावधान' गाजे. ६१
द्रव्यमदानें मत्त थेरडे तुझियांमाझारीं,
दुष्ट कसाई किती नाडती परक्यांच्या पोरी. ६२
कांचनभटजी कितीक उदरीं कांटे भरण्यास,
द्रव्यासाठीं विकिती गाई अशा कसायांस. ६३
भद्रेश्वर किति जमवुनि देती असला बाजार,
परसौख्याची चिता रचोनी थाटति संसार. ६४
दिसत नसे कां तुला समाजा कृति ही नीचांची,
ह्मणुनि चालली विटंबना ही अनाथ गाईची. ६५
हंबरडे फोडिती, ऐकुनी फाटतसें हृदय,
तुलाच कैशी उदासीनता आठवली हाय ! ६६
"शुभमंगल" हें ऐक समाजा ! ऐक "सावधान,"
सावध होई, गेली नाहीं नीज कशी अजुन? ६७

मुंबई,
जुलै १९१८.

## २४ चिमुकला संसार

वाजुनि गेले अकरा,
पोटास्तव खपणारा
कामकरी जन सारा
निघुनि जाय, शांतवली चाळ ही जरा.
बाप कचेरीस जाय,
गृहकर्मीं गुंग माय,
काढुनि हलकेच पाय
ग्यालरींत बालांनीं खेळ मांडिला. १
कमला, विमला, तारी,
पटपट जमलीं सारीं,
मधुलाही ये हिरिरी
घुसला खेळांत वदे ' मीही येणार !'
तयारीस काय उशिर ?
पीठ मीठ ये झरझर,
कशासही ना कमतर,
क्षणार्धांत राहि उभा चिमणा संसार ! २
शंख शिंपलेच किती
मांडुनि पाटावरती,
मानुनि त्या देवमूर्ति,
गंधफुलांवांचुनि मधु करित पूजना.
ज्या हृदयीं भाव वसत,
गंध सुमन काय तेथ ?

भाव नसे आमुच्यांत
गंध–धूप–सुमनांची ह्मणुनि योजना. =
चूल न सरपण कांहीं
सामुग्री पुरि नाहीं
त्यावांचुनि लवलाही
पाक सिद्ध होइ सकल जेवाया बसलीं.
मोदें हांसत खेळत,
जेवण असतां भरांत,
**कमलेला मधु** बोलत
" मी नवरा तूं नवरी, घांस दे तरी !" ४–
लग्नाच्या मंडपांत
बसली असतां पंगत
घांसाचा थाट होत
लग्न नसें–थाट परी आठवला बालां.
निर्विकार हृदयांची
जोडी ही दोघांची,
लाज तिथें मग कुठची ?
**मधु** वदतां **कमलेनें** घांस त्या दिला ! ५
दृश्य किती गोड अहा
अज्ञ तुह्मी अजुनि अहां
ह्मणुनी **मधु**बाळ ! पहा !
' नवरी' हो ह्मणतां तव नवरी ती झाली.
तूं नवरा ती नवरी
जोडी ही छान खरी,

अर्थ यांत खोल परी
जाणिव ही तुज बाळा! अजुनि कोठली? ६
ऐशापरि मोदभरें
झालें भोजन सगळें,
संपतांच **मधु** बोले
"तुह्मी निजा–मी आतां गस्त घालतों."
इतुकें वदुनी उठला
करिं घेऊनि काठीला
बाल शिपाई सजला,
गस्त करी परि वरती दिवस तळपतो. ७
पोरी झोपेंत गुंग
**मधुकर** निजकार्यदंग,
संसारा येइ रंग,
" **तारे**–ये–इकडे " ही हांक कोठुनी?
उठल्या **कमला, विमला,**
करित **मधू** पोबारा,
**तारि** पळे गेहाला,
चिमणा संसार लया जाइ त्या क्षणीं. ८
मांडुनियां तास पुरा
अजुनि नसे जरि झाला,
तेवढ्यांत संसारा
आदि अंत होइ–यांस दुःख तिळ नसें.
आम्ही सौख्यांत दंग
असतां जरि होइ भंग,

हृदय होतसें दुभंग,
दु:खभरें जग आम्हां शून्य गमतसें.
सृष्टीचीं गोड फुलें
छकुलीं निष्पाप मुलें
त्यांनीं जें रेखटलें
चित्र किती बहरीचें हें संसाराचें ?
ओसरुनी परि शिशुपण
हळू जसें येइ ज्ञान,
जग सगळें ये कळून,
हेंच मधुर चित्र पुढें पालटतें अमुचें. १०
गेली ती गोड घडी,
आस उठे मनिं वेडी
घ्यावी बाल्यांत उडी,
कल्पांतीं गोड काल कधिं न तसा येणें.
आठवतां बाल्य सकल
बाल्याचे गोड खेळ
अश्रुपूर ये खळखळ
सौख्यावरि त्या आतां आशेनें बघणें. ११

मुंबई,
नवंबर १९१८.

---

## २५ कै. ‘केशवसुता’स—

जइं काळाचा पडदा पडला,
आयुष्याचा अंक संपला,

जनता वदली आपण मेलां,
वेडी जनता मर्म यांतलें तिजला कळलें नाहीं.
स्वैरवृत्तिचा आत्मा तुमचा
करि कंटाळा जड देहाचा,
तोडुनि टाकी पाश जगाचा,
तेव्हांपासुनि दिव्य 'तुतारी' फुंकित हिंडत राही. १

वरुनी वरुनी जनता पाही,
तिला " तुतारी " कळली नाहीं,
'गोविंदाग्रज' पुढती येई
विशद करोनी दावित जगता काय 'तुतारी' आहे.
खडबडुनी जग जागें झालें,
इकडे तिकडे पाहुं लागलें,
पुरे जगाला आतां पटलें,
जिथें पहावें तिथें 'तुतारी' ताना छेडित आहे. २

तेव्हांपासुनि जनांत सगळें
नव्या स्फूर्तिचें वारें भरलें.
जिकडे तिकडे काव्य पसरलें
किती " तुतारीभक्त " जाहले त्यांतिल हा मी एक.
कविता जों मी वाचित राहीं,
ओळींओळींमधें नवाई,
घडीघडीला उमगुनि येई,
सतत माधुरी सेवन करितों हरपत नाहीं भूक. ३

ज्या मार्गांतुनि आपण गेलां,

ज्या मार्गावरि तुमचा चेला,*
तोच मार्ग मीं अंगिकारिला,
धाष्ट्र्य खरोखर, परी असूं दे प्रसाद माझ्यावरती.
दिव्य 'तुतारी' पुढें ठेवुनी
स्फुर्तिरसाचीं रचुनीं गाणीं
सदा जगाच्या पुढें गाउनी
चराचरांतुनि अणुरेणूंतुनि उठविन काव्यस्फूर्ती. ४

मुंबई,
डिसेंबर १९१८.

---

## २६ केशवसुतांची कविता वाचून

ज्या प्रासादामधें शिवाजी
स्वैर नांदला तो रणगाजी,
प्रेक्षक होउनि आह्मी आजी
नसुनि योग्यता तिथें हिंडणें आह्मां लाजिरवाणें. १
स्वातंत्र्यास्तव राघुभरारी
पाजळुनीयां निज समशेरी
लढला तो ज्या रणांगणावरि,
सहल कराया तिथें हिंडणें आह्मां लाजिरवाणें. २
नव्या दमाचा शूर शिपाई
रूढीवरती करुनि चढाई,

---

* प्रस्तुत कविता लिहिली त्यावेळीं कै. केशवसुतांचे सच्चे चेले 'गोविंदाग्रज' हयात होते. महाराष्ट्र–भाषेच्या दुर्दैवानें 'गोविंदाग्रज' दिवंगत झाल्यानें वरील ओळींत फरक होणें अपरिहार्य आहे.

लढतां लढतां मरुनी जाई,
त्या मैदानीं फुकेंच फिरणें आह्मां लाजिरवाणें. ३
एकवटोनी सारी शक्ती
एकवटोनी सारी स्फूर्ती,
उठवुं चेतना साऱ्या जगतीं,
जरि न एवढें घडें, तरी तें आह्मां लाजिरवाणें. ४

मुंबई,
डिसेंबर १९१८.

---

# २७ सवाल

दिवसामागुनि दिवस चालले, कालामागुनि जाई काल,
किती कुलगडीं भिजत राहिलीं, लागूंदे पुरताच निकाल. १
एक मेंढरूं इकडुनि जातें, मागुति दुसऱ्यानें जाणें,
गेलेलें तें जिवास मुकतें, ह्मणुनी दुसऱ्यानें मरणें. २
अंध आमुची अशी रहाटी, अशीच कां चालायाची ?
मळलेला पथ सोडायाची नाहिंच छाती कोणाची. ३
वृत्ती बनतां अशी आमुची कोण पुढें मग सरणार ?
कुणा ह्मणावें आह्मीं आतां 'सुधारणेचा' शाहीर ? ४
'सवाल' करते सगळे गेले धजेच ना पुढतीं कोणी !
उरलेल्यांनीं 'सवाल' करणें भ्याडपणाला सोडोनी. ५

## सवाल १ ला

## नवें कां जुनें ?

निजलेल्यांना मागें टाकुनि काळ चालला पुढेंपुढें,
निसटुनि गेला, आम्हीं बघतों टकमक आतां तयाकडे. १

मागें कोणी केलें कांहीं, आह्मीं करतों कांहितरी,
अंगावरती बाजू येतां ह्मणतों रूढी फार बरी. २
रूढी कुठली ? कोणी केली रूढ तियेला अमुच्यांत ?
कळल्यावांचुनि फुकें बोलणें यांत कशाचा पुरुषार्थ ? ३
जुन्यापुराण्या काळीं केव्हां रुचलें कांहीं कोणाला,
नव्या जगानें तें कवळावें न्याय सांगणें हा कुठला ? ४
विचार करतो कोण येवढा ? गरज एवढी कोणाला ?
ज्याचें त्याला पुरें जाहलें; कोण पाहतो दुसऱ्याला ? ५
उदासीनता सकलां आली पुरें फावलें रूढीला,
बळावुनी ती मागें ओढी पहा धांवत्या कालाला. ६
काळ बोलतो " विचार कसला चला भराभर पुढें सरा,"
दरडावोनी रूढी सांगे " जासि कुठें फिर माघारा." ७
झगडा ऐसा सतत चालला, चालायाचा असा पुढें,
मार्ग कोणता अंगिकारणें बघुनि ठरविणें स्वतःकडे. ८
शतक पुढें इतिहास जगाचा, आह्मीं मागें कुठेंतरी,
पहाट नाहीं अजुनि आमुची—सूर्य उगवला जगावरी. ९
खुशाल जावें पुढें जगानें, नाहीं आम्ही येणार,
धरुनी हा अभिमान कोरडा कसें आमुचें होणार ! १०
पुढें होउनी जगास नेणें—नाहीं अमुच्या नशिबाला,
जगासारखें नवे बनोनी कालासंगें जाऊं चला. ११
नवें बनावें ह्मणतों ह्मणुनी 'घेउनि सारें नवें नवें,
जुनेंच सारें टाकुनि द्यावें ' अर्थ यांतला हा नोहे. १२
जुन्यानव्यांतुनि बरवें घेऊं-फोल झुगारूं बाजूला,
अभिमानानें अंध बनोनी जुनेंच सारें काशाला ? १३

अनुक्रम १५५८ ... क्रमांक ... दि. ७३

दृष्टीची ही समता सोडुनि भक्त रूढिचे बनलेले,
वदतिल सारे नव्या पिढीचे विचार असले भकलेले. १४
विचार पुरता करा मनाशीं, काय बोलणें मग बोला,
विद्यार्थी मी **नव्यायुगाचा** सवाल करितों तुम्हांला. १५
मुंबई, डिसेंबर १९१८.

---

## सवाल २ रा.

# २८ धर्म बुडतो काय ?

'धर्म धर्म' या नांवाखालीं काय काय येथें चालें,
'बड्या घराचा पोकळ वासा' ह्मणणें हें नशिबीं आलें. १
पवित्र हेतू दूर राहिला—तत्वें दडलीं-बाजूला,
प्राणावांचुनि कुडी राहिली, मोल तियेचें कोणाला ? २
खराखुरा निज धर्म सोडुनी, बहिरंगावर भुलणारे,
तत्वें सोडुनि सोहाळ्यांचे माजवितां कां देव्हारे ? ३
कुणी फलाणा असाच चाले, कुणी बोलतो कांहींच,
पेहराव हा असा कुणाचा ह्मणुनि ठरे कां तो नीच ? ४
किती दाखवूं तुह्मांस ऐसे धर्मनिष्ठ ज्यांना वदती,
कृती तयांच्या ऐकुनि येइल थरकांटा देहावरती ! ५
धुवट सोंवळे वरुनी—यांचीं हृदयें आंतुनि सडलेलीं,
नव्या पिढीनें धर्म बुडविला ह्मणुनि उठविती हाकेली. ६
धर्म असा कां उथळ जाहला, रुचेल त्यांनीं बुडवावा ?
कळल्यावांचुनि कुणास नसता दोष कशाला लावावा ? ७
वंद्य सनातन म्हणुनि दुमदुमे कीर्ती ज्याची दिगंतरीं,
तत्वें ज्याचीं परकीयांनीं वंद्य म्हणुनि धरियलीं शिरीं. ८

त्या धर्माचा आत्मा होता–तसाच आहे–असणार,
कालासंगें रूप फिरावें हाच जगाचा व्यवहार. ९
आज नवें तें जुनें उद्यांला–मधेंच उठतें नव कांहीं,
सहज रहाटी अशी चालली, निमित्त नाहीं कोणीही. १०
नव्या पिढीची खुशाल नवता फैलावूंदे किति स्वैर,
किती होउंदे रूप नवें परि धर्म कधीं ना बुडणार. ११
ठसवुनि ध्या हें पुरें मनाशीं पहा अगोदर स्वतःकडे,
आधीं शुद्धी करुनि स्वतःची दृष्टी वळवा जगाकडे. १२
धर्म काय हें जोंवरि तुह्मां खरेंखुरें कळलें नाहीं,
आम्ही सगळा धर्म तारितों–अहंमन्यता कशास ही ?१३
कुणि लेवूंदे वसन कोणचें–खुशाल कोणी बनो नवा,
तत्वांवरती नजर ठेवुंया–रंग कशाला फुका हवा ? १४
पवित्र हेतू दूर सारुनी, विचक्षणा कां भलभलती,
विद्यार्थी मी **नव्यायुगाचा** सवाल करितों तुम्हांप्रती. १५

**मुंबई**, जानेवारी १९१९.

---

## सवाल ३ रा

## २९ आंधळे कीं डोळसे ?

तुम्ही अंध कीं डोळेवाले म्हणुनि वागतां जनतेंत ?
जरी पुसावें असें कुणाला सहज भेटतां मार्गांत. १
टवकारोनी नयन आपुले तेच उलटुनी पुसतात,
जागे असुनी तुम्ही बोलतां–अहांत अथवा निद्रेंत ? २
तणावलेल्या ताठ पापण्या बघुनी बुबुळें गरगरतीं,
भ्रमिस्त झाला ह्मणुनि बोलतां अशीं बोलणीं भलभलतीं. ३

कोण आंधळे, कोण डोळसे, न दिसे तुमच्या नयनांला,
दिसे अह्मांला खास एवढें येइ अंधता तुह्मांला. ४
असे हरीचे लाल भेटतां मौन सेवणें फार बरें,
वाद करावा तरी फुकाचा खरें न यांना पटणारें. ५
परी मागुती विचार करितां—मनीं माजतें काहूर,
खुळे बापुडे मर्म यांतलें कधीं तयांना पटणार? ६
ताठ पापण्या, फिरकीं बुबळें काय लक्षणें दृष्टीचीं,
अंतरजिवणी आंत नसे तरि दृष्टि काय ती कामांची? ७
टवकारोनी एकसारखें प्रेत पाहतें गगनांत,
ताठ पापण्या ह्मणुनि डोळसें कधीं तयाला वदतात? ८
कळसूत्री बाहुली कापडी सजीव भासे नयनांतें,
बरेंबुरें कांहींहि पाहुंदे गरगर बुबळें फिरवीते. ९
दोन लक्षणें दोहोंमाजीं उघडपणें हीं दिसतात,
ह्मणुनि डोळसे या दोघांना सूज्ञ कधीं कां वदतात? १०
किती आंधळे तुह्मां दाखवूं ताठ पापण्या असणारे,
फिरकीं बुबुळें असुनी झालें शून्य जयांना जग सारें. ११
यावरुनी मग ठरे एवढें दोन लक्षणें जरि असलीं,
अंतरजिवणीवांचुनि दृष्टी फोल जगानें गणियेली. १२
अंतरजिवणी काय एवढें आतां या पुढती बघणें,
कोण आंधळे, कोण डोळसे, त्यावरुनी मग ठरवीणें. १३
न्याय पाहुनी मोद वाढणें, अन्यायाचा तिटकारा,
हृदयाच्या या क्रिया चालती संतत नयनाचे द्वारां. १४
अन्यायाला तुडवुनि जाणें न्याय मांडणें जनतेंत,
अंतरजिवणी हीच पाहिजे आज आमुच्या नयनांत. १५

न्यायाचा अभिमान जयाला अन्यायाचा तिटकारा,
तदनुसारिणी कृती जयाची तोच डोळसा जगीं खरा. १६
हीच कसोटी लावुनि बघतां काय येतसे दृष्टीला,
एकामागुनि एक चालली अमुची अंधांची माला. १७
ज्ञानरवीचा प्रकाश उज्ज्वल जगीं चहुंकडे असतांना,
काठीवाल्यावांचुनि आम्हां पाउल एकहि उचलेना. १८
काठीवाला पुढें चालतो माळ चालते मागोनी,
वदेल तो तें सत्य मानुनी होकारावें सकलांनीं. १९
सामाजिक अन्याय कितितरी उघड चालती अमुच्यांत,
काठीवाले खुशाल ज्यांना न्याय म्हणोनी वदतात. २०
'जुनें तेवढें सोनें' ज्यांना पुरा नव्याचा तिटकारा,
काठीवाले असें बोलती दोष तयांना काशाला ? २१
तत्व जयांचें जें ठरलें तें खुशाल त्यांनीं बोलावें,
पूर्ण विचारावांचुनि आम्हीं त्यावरि कां अवलंबावें ? २२
अंध राहुनी स्वत्व झुगारुनि परदृष्टीनें जग बघणें,
याहुनि दुसरें जगीं न कांहीं आम्हांला लाजिरवाणें. २३
ताठ पापण्या जरी आमुच्या गरगर बुबुळें जरि फिरतीं,
अंतरजिवणी नाहीं नयनीं म्हणुनी अमुची हो माती. २४
ज्ञानाचें झणझणीत अंजन चढवुनियां अमुच्या नयनीं,
अंधपणासह काठीलाही खुशाल देऊं फेंकोनी. २५
काठीवाले हटतिल मागें काय तयांची मग छाती ?
वक्रपथानें आम्हां नेणें शक्य न कोणा कल्पांतीं. २६
अन्यायाला न्याय बोलती शास्त्रें कुठलीं तीं दावा,
खडसावोनी 'सवाल' आम्हीं खुशाल त्यांना फेंकावा. २७

नव्याजुन्यांचें मंथन करुनी न्याय्य कोणतें ठरवाया,
न्यायासाठीं वाद कराया खुशाल पुढतीं होऊं या. २८
जरी करूं हें तरी डोळसे आम्ही शोभूं खरेखुरे,
अंध म्हणोनी खुशाल घ्यावें न तरी याहुनि फार बरें. २९
पृच्छा ऐकुनि पुरी विचारी होती तुमची जरि दृष्टी,
उथळपणाचीं खुळीं उत्तरें वदनीं तुमच्या ना येती. ३०
म्हणुनी म्हणतों विचार पुरता करुनी मग द्या जाब मला,
विद्यार्थी मी **नव्यायुगाचा** सवाल करितों तुम्हांला. ३१

बुधगांव, जुलई १९१९.

---

## सवाल ४ था

## ३० तुह्मी कोण ?

'कोण तुह्मी?' हें कुणास पुसतां सकल सांगती नवेनवे,
ऐकुनियां तें हंसूं येतसे, विचार करुनी सांगावें. १
कुणी बोलतो वंशज आम्ही खरतर **विश्वामित्राचे**,
**वशिष्ठ** पूर्वज कुणी सांगतो, कुणी नांव घे तिसऱ्याचें. २
थोर कुलींचे वंशज आह्मी तीन्ही लोकीं वंद्य सदा,
अहंपणाचीं अशीं बोलणीं ऐकूं येती कितीकदां. ३
कुणी बोलतो पूर्वज माझे होते मोठे नरवीर,
**खर्ड्या**च्या संगरांत त्यांची अतुल गाजली समशेर. ४
कोण बोलतो जन्म आपुला असे फलाण्या वंशांत,
त्या वंशाचें नांव दुमदुमे अजुनी साऱ्या जगतांत. ५
असे अशांना एक सांगणें असाल मोठ्या वंशाचे,
नांवावरती त्याच विकोनी हंसें कशाला थोरांचें? ६

पूर्वज मोठे नांव तयांचें साऱ्या जगता जाहीर,
त्या वंशींचे ह्मणुनि थोरवी कधीं न आह्मां मिळणार. ७
ज्या उद्यानीं गुलाब फुलतो तिथेंच उगवे घाणेरी,
गुलाब झुलवी ह्मणुनि मोहवी घाणेरी कां कधींतरी ? ८
सूर्य प्रकाशे, त्याच नभावरि कितीक उठती कृष्णघन,
रवि तेजस्वी ह्मणुनि फुकाचा मेघांना कां अभिमान ? ९
महासागरीं मौक्तिक उपजे–तिथें उपजती शंख किती,
बंधुत्वानें कधीं न येते दुबळ्या शंखांना महती. १०
महत्व जगतीं ज्याचें त्याला, येत नसे अनुषंगानें,
पूर्वज मोठे ह्मणुनी आम्हीं वागावें कां ताठ्यानें ? ११
वंद्य मुनींची गोष्ट कशाला ? कुठें तयांची दीप्तिमता ?
तेजबलानें तेव्हां त्यांनीं कांपविलें साऱ्या जगता. १२
तेज लोपलें त्यांच्यासंगें, निर्बल आह्मी आज असे,
फुकी अहंता थोरपणाची तेजाचा लवलेश नसे. १३
येतां जातां रुचेल त्यांनीं तुडवुनि जावें आह्मांस,
असे आमुचें नाणें खोटें, दोष कशाला दुसऱ्यास ? १४
असतिल कोणी पूर्वज केव्हां निधड्या छातीचे वीर,
ऊर धडधडे परी आमुचा शब्द काढतां समशेर. १५
**भारतमाता** हांका मारी हिंदपुत्र हो पुढें सरा,
आली वेळा उठा दाखवा तेज आपुलें जगताला. १६
नांव पाहिजे पुढें सराया छाती नाहीं परि अमुची,
नांवावरती उगाच विकुनी विटंबना कां नांवांची ? १७
स्थिती अशी ही केविलवाणी त्यांत मानुनी अभिमाना,
सदा लववितो मान, अजुनि परि जिरला नाहीं अहंपणा. १८

अहंपणा हा नको घातकी कृती करूंया कांहिंतरी,
जगीं स्वतःला नांव कमावूं अवलंबूया स्वतःवरी. १९
शतक विसावें हें प्रगतीचें काय सांगतें आह्मांस ?
'चढाओढ चालली जगावरि नीज कशी ये तुह्मांस ?' २०
'नीज कशाची ?'—अहंपणाची निशा असे ही चढलेली,
कृतीवांचुनी प्रगती व्हावी, आह्मां असली हांव खुळी. २१
पूर्वज मोठे आह्मी मोठे सहजीं जाऊं जगापुढें,
तर्कवाद हा पुरे फुकाचा चला कृतीनें जाउं पुढें. २२
अहंपणाला सोडूं ह्मणतों परी असोंदे 'अभिमान,'
स्वत्व जागवूं जगा दाखवूं **आह्मी कोणाचे कोण.** २३
अभिमानाची मशाल जाळूं त्याच ज्योतिच्या तेजांत,
अंधारांतुनि मार्ग काढणें खराखुरा हा पुरुषार्थ. २४
तत्त्व यांतलें असे एवढें ठसवुनी घेऊं पुरें मना,
जोड नसे त्या, जरी कृतीची, शोभा नाहीं अभिमाना. २५
असेल छाती, तरी कृतीला लागा, कमवा, जगीं नांव,
नातरि माना घाला खालीं, सोडुनि द्या वेडी हांव. २६
विचार सारा करा मनीं मग सांगा 'तुह्मी कोण !' मला,
विद्यार्थी मी **नव्यायुगाचा** "सवाल" करितों तुह्मांला. २७

बुधगांव,
जानेवारी १९२०.

---

## ३१ पूर्वस्मृति

होता मंगल काल एक फिरलों संगें तुला घेऊनी,
उद्यानीं मनरंजनार्थ अथवा आम्राचिया काननीं;

केव्हां तोडुनि गोजिरीं वनफुलें प्रेमें तुला अर्पिलीं,
केव्हां नूतन आम्रमंजिरि तुझ्या वेणीवरी खोंविली. १
जादूचा कर लागतां बहरलीं गालीं गुलाबी फुलें,
आनंदें तव लोचनीं झरझरां अश्रू उभे राहिले,
हस्तीं घेउनियां मृदू कर तुझा माझ्या हृदाआंतलीं
प्रीतीचीं वचनें त्वदीय श्रवणीं सोत्कंठ म्यां ओतिलीं. २
होतों सौख्यगिरीवरी तुजसवें दैवा न हें साहलें,
माझ्यापासुनि दूरदूर ह्मणुनी त्यानें तुला ओढिलें;
वार्ता जेथुनि यावयास सखये ! लागे अती आवघी,
तेथें येउनि पाहणें तुज, मला ना शक्य जन्मांमधीं. ३
तेथें तूं असशील मग्न सखये ! सौख्यांत रात्रंदिन,
येथें मी करितों अखंड हृदयीं प्रेमें तुझें चिंतन;
तूं नाहींस इथें ह्मणूनि गमतें निःसार सारें मना,
नेतों काल कसा गडे तुजविणें, नाहीं तुला कल्पना. ४
उद्यानीं फिरतां प्रभातसमयीं केव्हांतरी राजसे !
एकादी दंवबिंदुयुक्त कलिका दृष्टीपुढें येतसे;
मानेनें खुणवी हळूं मधुकरा लाजे बघे भूवरी,
सौख्याचा गतकाल आठवुनियां वृत्ती बने बावरी. ५

बुधगांव,
जुलै १९१९.

---

## ३२ स्थित्यंतर

(चाल—गज्जल.)

नील गगनाचिया खालीं लकेऱ्या घेत फिरणारा,
स्वैरतेचा बाल चिमणा मुदें आकाश भरणारा. १

असा चंडोल धरुनीयां पंजरीं तो सुवर्णाच्या,
ठेवियेला जरी कोणीं रुळत राशींत सौख्याच्या. २
अन्नपाना जरी नसली वाण केली कुणीं त्याला,
सुखासाठीं जरी त्याच्या कुणीं स्वप्राण पांखंडला. ३
कृत्रिमाचें उभें केलें गगन कोणीं तयाभंवतीं,
विहग दुसरे जरी दिधले तया खेळावयासाठीं. ४
सभोंतालीं जरी असली गोडशी गार वनराई,
सभोंतीं गार कारंजीं जरी उडलीं थुईथूई. ५
सुखाच्या या हवेंमाजीं स्वैरतेचें नसे वारें,
म्हणोनी हेंच चंडोला, विषावाणी गमें सारें. ६
स्मरोनी गोड सौख्याच्या मनाच्या स्वैर त्या लीला,
उदासावें सदा जीवीं दुजें ना शक्य दुबळ्याला. ७

* * * *

जरी कष्टप्रदा असली स्थिती पहिली, तरी सहते,
स्वैरतेच्यामुळें तीही सुखें जीवास मानवते. ८

बुधगांव, डिसेंबर १९१९.

---

## ३३ हिंदी तरुणास

मार्ग जरी तुझिया पुढचा, दाट धुक्यानें भरलेला,
पाउल वाटहि त्यांतूनी नच दिसते तुझिया डोळां. १
पसरे दोन्ही बाजूंला कांटेरी जंगल दाट,
झटति तुला मागें घ्याया शत्रु तुझे आटोकाट. २
परिस्थिती दुर्धर ऐशी रोखुनियां तुजवरि पाहे,
झिडकारुनि पुढती सरणें, मर्दपणा यांतचि आहे. ३

राष्ट्राचा **भगवा झेंडा** ज्या मार्गावरुनी गेला,
तो मार्ग नोहता केंव्हां मउमऊ फुलांचा केला. ४
उन्नतीपंथ कुठच्याही व्यक्तिचा असो राष्ट्राचा,
कंटकावेगळा केंव्हां कधिं न तो सांपडायाचा. ५
तव मार्ग जरी कांटेरी, भोंवतीं संकटें भारीं,
निश्चयापुढें तीं तुझिया वितळतीं भरभरा सारीं. ६
मार्गातिल कांटे तुजला गमतील फुलांसम मृदुल,
जसजसा पुढें तूं सरशी, तसतसें धुकें वितळेल. ७
त्यापल्याड गेल्यावरती येइल मग तुझिया नयनीं,
भूभाग भूषलेला जो स्वातंत्र्यसूर्यकिरणांनीं. ८
स्वर्गीयसौख्य ज्या ह्मणती तें तुला मिळे त्या ठायीं,
संकटांस झिडकारोनी, चल ऊठ पुढें तूं जाईं. ९

बुधगांव,
जानेवारी १९२१.

---

## ३४ 'बॅकबेच्या वाळवंटांत'

[ सुमारें दोन वर्षांपूर्वी विद्यार्थीदशेंत एका जिवलग मित्रासह उपरोक्त ठिकाणीं बसल्या वेळच्या एका पुसट स्मृतिचित्रावर खालील कवितेची उभारणी केली आहे. ]

बोलत होतों आह्मी दोघे देशहिताच्या गोष्टी,
विचार करतां तदा आमुचीं हृदयें झालीं कष्टी. १
प्रौढपणींची विचारसरणी नव्हती तारुण्यांत,
तरुणपणाचे विचार झाले परि जागृत आह्मांत. २

तरुणदृष्टिनें पाहुं लागलों जेव्हां आह्मी भंवतीं,
सभोवतालीं दिसूं लागली घोर निराशा पुरती. ३
घोहींकडुनी पेटत असतां राष्ट्रहिताची होळी,
शक्त न दिसला तेव्हां आम्हां कोणी जाया जवळीं. ४
तारुण्याच्या तरुणमतीनें तेव्हां आह्मी दोघे,
सहज लागलों खरे पुढारी मोजायाच्या मागें. ५
प्रथम अंगुली एका दिधली अनामिका दुसऱ्यास,
परी मध्यमेसाठीं कोणी नच दिसला आह्मांस. ६
**तेतिस कोटी** प्रजा बोलती अमुच्या **हिंदुस्तानीं**,
तीन पुढारी उणेपुरे नच दिसले आह्मां कोणी. ७
नांवामागुनि नांवें आलीं कितीक आह्मांपुढती,
तिळ हालेना परी मध्यमा त्यांतिल कोणासाठीं. ८
कुणांत कांहीं कुणांत कांहीं वैगुण्याला थारा,
स्वार्थत्यागाविणें जयांचा अवघा बोलपसारा. ९
किती पुढारी परी दंग ते अपुलाल्या रंगांत,
कृती खरोखर कांहिं न करतां स्तोत्रें अपुलीं गात. १०
**देशभक्त** हें नांव गोडसें कितिकांमागें होतें,
स्वार्थभक्तिच्यावांचुनि ज्यांनां कांहीं माहित नव्हतें. ११
बोलघेवडे बोलत सुटले चहूंकडे मोकाट,
नांव आपुलें पुढें कराया झटती आटोकाट. १२
डाळिंबाच्या दाण्यासाठीं पोपट बोले बोल,
नांवासाठीं पोपटपंची करीत होते फोल. १३
बोलायाचीं ध्येयें सवतीं कृती जयांची सवती,
अशा मण्यांची माळ तेधवां दिसली आम्हांपुढती. १४

दोन पुढारी खरे, तयांच्या भंवती असली सेना
नांवासाठीं करीत होती नटव्या चेष्टा नाना. १५
भार ठेवुनी ज्यांच्यावरती बघती सगळे डोळे,
बघुनि तयांचे अशातऱ्हेचे भलतेभलते चाळे. १६
तापुनि गेलें रक्त आमुचें तेव्हां तारुण्याचें;
उद्देशोनी तयांस वदलों भलतेंसलतें वाचें. १७
एकामागुनि एक पुढारी घेउनियां विषयांस,
परोपरीनें तेव्हां आह्मीं छानछानलें त्यांस. १८
आजूबाजुस कोणी नव्हतें माणुस त्या वेळेला,
वेसण नव्हती ह्मणुनि तेधवां दोघांच्या जिभलीला. १९
तारुण्याच्या अविचाराचा सळसळता उन्माद,
बोलबोलतां भरास आणी दोघांकरवीं वाद. २०
स्थान कोणतें, विषय कोणता, हें न मनीं ठेवून,
खड्या सुरानें बोलुं लागलों होउनियां बेभान. २१
निकटिं आमुच्या स्वच्छंदानें सागर खळबळणारा,
हसूं लागला ऐकुनि तेव्हां वाद आमुचा सारा. २२
त्या हास्याची खळबळ जेव्हां कानीं अमुच्या पडली,
वादांमधुनी वृत्ती तेव्हां ताळ्यावरती आली. २३
शरमुनि गेलों विचार केला तैं आह्मीं दोघांनीं,
अविचारानें अधिक बोलणें उचित न विद्यार्थ्यांनीं. २४
असोत कोणी कसे पुढारी, करोत कांहींबाहीं,
उणीं उत्तरें त्यांनां वदणें उचित आपणां नाहीं. २५
विद्यार्थ्यांच्या कर्तव्याची कक्षा ठरलेली जी,
सोडुनियां ती कशास शिरणें भलत्या क्षेत्रांमाजीं ? २६

विचार ऐसा करुनी उठलों तेथुनि आम्ही दोघे,
चालूं लागलों, हांसत होता समुद्र अजुनी मागें. २७

बुधगांव,
जानेवारी, १९२१.

---

## ३५ बॅकबेच्या वाळवंटांत

( २ )

[ दोन वर्षांपूर्वीची गोष्ट. काळोखी रात्र. नेहमीचें भरतीच्या वेळचें समुद्राचें भीषण स्वरूप काळोखांत जास्तच भीषण दिसत होतें. समुद्राच्या प्रचंड लाटा तीरावरच्या दगडी बंधाऱ्यावर थडाथड आदळत होत्या. अशा भीषण समुद्रास उद्देशून मनांत आलेल्या कल्पनांचें त्या वेळीं रेखाटलेलें शब्दचित्र इतक्या दिवसांनीं आज रसिकांपुढें आणण्याचा प्रसंग येत आहे. ]

उसळ सागरा ! उसळ असा !
खेळ सागरा ! खेळ असा !
स्वतंत्रतेच्या अंकावरती लोळत राहीं स्वैर असा ! ॥ ध्रु० ॥

स्वतंत्रता तव प्रिय जननी
रिझवावें तुजला ह्मणुनी,
तरल वायुचा झुलता झोला बांधुनि दे तुज खेळाया;
झुलतांना झोल्यावरती
तव हृदयाला ये भरती,
त्या मोदाच्या भरांत हंससी पाहुनि दुबळ्या जगता या. १

बांधुनि दगडी बंधारे
आह्मी तुज आडविणारे,
स्वतंत्रतेच्या छकुल्यापुढतीं पाड आमुचा कोठवरी ?

रचिलेले तव राज्यांत
आशांचे किल्लेकोट
लाथेसरशी उडवुनि देशी लीलेनें तूं नभांतरीं. २
हांसत खेळत अवनिवरी
सळसळणाऱ्या या लहरी
आनंदानें नाचति गाती स्वातंत्र्याचे पोवाडे.
ऐकत असतां हें गान
हरपुनि जाई मम भान;
त्या गानाच्या भरांत दुबळ्या मानव्याचा विसर पडे. ३
थांब सागरा ! थांब जरा,
हृदयीं मजला दे थारा,
लाटांवरि तव घेउनि मजला खेळवीत ने वरवरती.
स्वतंत्रता चिर राहि जिथें,
फेंकुनि मजला दे तेथें,
तुडवाया मग मजसि पाहतों होइल कोणाची छाती ? ४

बुधगांव,
फेब्रुआरी १९२१.

---

## ३६ मित्र–स्मरण

[ कै. काशीनाथ रघुनाथ मित्र यांच्या स्मरणार्थ निघालेल्या मनोरंजनाच्या जुलई १९२१ च्या खास अंकासाठीं प्रस्तुत कविता लिहिली गेली.]

शार्दूलविक्रीडित.

ध्येया उज्ज्वल ठेवुनी निशिदिनीं डोळ्यांपुढें जागृत
ज्यानें वाङ्मयसेवनीं झिजविली स्वीया तनू संतत,

आह्मां सोडुनि ज्यासि ना उलटलें अद्यापिही वत्सर,
त्या '**मित्रा**' स्मरतांचि हाय ! बुडतें दुःखार्णवीं अंतर ! १
ज्याचें कार्य समायिलें सकलही एका '**मनोरंजनीं**',
उत्कर्षाहुनि त्याचिया नच दुजी आशा जयाच्या मनीं,
सर्वस्वावरि सोडिलें उदकही ज्यानें तयाखातर,
त्या '**मित्रा**' स्मरतांचि हाय ! बुडतें दुःखार्णवीं अंतर ! २
नाना लेखक-चित्रकार-कविंशीं मित्रत्व संपादुनी
ज्यानें त्यांकरवीं असंख्य रसिकां कीं मित्र केलें जनीं,
यायोगें निज नाम '**मित्र**' करवी जो सार्थ भूमीवर
त्या '**मित्रा**' स्मरतांचि हाय ! बुडतें दुःखार्णवीं अंतर ! ३
वीसाव्या शतकांत पाद पहिला जो आजला चालला,
त्याचा वाङ्मयकाल कोणि पुढतीं शब्दांत रेखाटला,
ज्याचें नांव तयांत अक्षय पुढें राहे टिकोनी चिर,
त्या '**मित्रा**' स्मरतांचि हाय ! बुडतें दुःखार्णवीं अंतर ! ४

बुधगांव, एप्रिल १९२१.

---

## ३७ '**हृदयेश्वरीस**'—

**केदार**—झपताल.

दूर कोठें तरी वससि हृदयेश्वरी !
घोर मध्यंतरीं उदधि खवळे,
पोहुनी पोहुनी हात दमले परी;
अजुनि किति पोहणें मजसि न कळे. १
तूं तिथें, मी इथें, घोर जग भोंवतें,
बघुनि मन थरकतें पुढति जाया;

आंतुनी कामना धीर देते मना,
विसरवी यातना अधिर हृदया. २
खवळुनी खालतें उदधिजल उसळतें,
त्यांमधें मिसळतें तिमिरजाल,
कहर करि यामुळें विश्वही चळचळें.
त्यांत मम चालले अमित हाल. ३
दोन दोहींकडे तुटक भीषण कडे,
पाहतां त्यांकडे धीर गळतो;
परि मनीं ठेवुनी मूर्ति तव मोहिनी,
ठरिव मार्गांतुनी मुळिं न चळतों. ४
भिवविती भोंवतीं मेघ भेसुर अती,
प्रलयकालाप्रती दाविताती;
फेंकुनी मजवरी किरण उज्वल परी
मार्ग दावी तुझी रुचिर मूर्ती. ५
घोर उदधी जरी खवळुनी यापरी,
मजसि मार्गावरी रोधिताहे;
एकदां लागला गोड तूझा लळा,
तुजकडे तो मला ओढिताहे. ६
यातना यापरी, साहिल्या अमित जरि,
मूर्ति तव गोजिरी, कां दिसेना ?
घोर अंधारमय उदधि करितो प्रलय,
अजुनि किति पोहणें सांगवेना. ७

बुधगांव, मे १९२१.

## ३८ चार शब्द

साधी, भोळी, निगर्व, सालस वृत्ति गडे तव असे,
अभिमानाचे शब्द कधीं तूं नच वदसी राजसे ! १
दिन एकादा येइल ऐसा पुढतीं केव्हांतरी,
अभिमानाचे 'चार शब्द' तरि वदशिल तूं सुंदरी ! २
कोमल करसंपुटीं ठेवुनी कपोल तव जेधवां,
मम काव्यावरि लोचनयुगुला फिरविशील तेधवां. ३
'प्रीती होती मजवरि याची' खास एवढे तरी
अभिमानाचे शब्द मुखांतुनि निघतिल तव सुंदरी ! ४

बुधगांव,
जून १९२१.

---

## ३९ एवढीच आशा

वत्सर युगुलाचा, जिवाच्या खुलत्या बहरीचा,
मम आयुष्याचा मनोहर काल वसंताचा,
हंसला ज्या काळीं मजवरी दिनमणि सौख्याचा,
गेलेला गेला, काळ तो आतां ये कैचा ? १
हंसरा मी प्रेमी, मजवरी विश्व सकल हंसलें,
नसलें जरि हंसलें, तुजमुळें मज तैसें दिसलें.
मोहक तव मूर्ती चिंतणें, त्यांतच लय घेणें,
तुज डोळेभरुनी पाहणें, यापरतें नेणें. २
कुठचा, कोणाचा, कोण मी तुज नव्हतें कळलें,
हृदयाहृदयांचें चिरंतन मीलन परि झालें;

नकळत नयनांनीं कितिकदां एकामेकांस
दिव्य प्रेमाचे कळविले अस्फुट संदेश. ३
प्रेमल नयनांचे किरण तव पडले ज्या ठायीं,
वेंचुनि तेथोनी सदोदित सांचविले हृदयीं;
त्या किरणाधारें चढाया चिरसुखसोपान,
उत्सुक हृदयाला, तयाचें विसरविलें भान. ४
लहरी चढचढल्या, सुखाची परमावधि झाली,
निष्ठुर नशिबाला एवढी ही वार्ता कळली,
झणिं सोसाव्याचा सोडुनी विरहाचा झोत;
दैव विझवुं पाहे हृदयिंची प्रेमाची ज्योत. ५
प्रेमाच्या धामीं न चाले दैवाची मात,
या दृढ विश्वासा दिला मी थारा हृदयांत;
अंतीं दैवाचा हाय ! परि हेतु खरा ठरला,
तव मूर्तीसंगें सुखाचा तारा मावळला. ६
तेव्हांपासोनी बैसुनी आशेच्या यानीं,
प्रणयकिरणयोगें क्रमितसें उर्वरीत रजनी;
दारुण विरहाची यामिनी कधिं ही उलटेल?
या जपमंत्राचें चालतें जपन सकल काल. ७
येइल सौख्याचा कधीं तो दिन येवो पुढती,
आतां तुजविषयीं जिवाची आस न यापरती;
पूजित जो तुजला निरंतर ठेवुनि हृदयांत,
"विरही" जीवाची स्मृती तुज राहूंदे सतत. ८

# ४० आकाशदिवा पाहून

( १ )

अश्विन वद्यांतील यामिनी,
असे दिवाळी दोन दिसांनीं;
एव्हांपासुनि कोणीं कोणीं,
दिवे लावुनी रंग कराया केली होती सुरवात.
अशाच हौशी कुणिएकानें,
निकट आमुच्या शेजाऱ्यानें;
तयार करुनी अतिशय यत्नें,
उभारलेला 'आकाशदिवा' तेवत होता तिमिरांत.

( २ )

भयाण काळोखाची रजनी,
मध्यरात्र गेलेली उलटुनि;
जग होतें झोपेंत गुंगुनी,
जागत होता 'आकाशदिवा' परी एकला या वेळीं.
विमनस्कपणें झोपेवांचुनि,
मीही पडलों होतों शयनीं;
खिडकींतूनी पाहत गगनीं,
सहज देखुनी दिवा तेवता, दृष्टी त्यावरती गेली.

( ३ )

दिवा जागता मीहि जागता,
तिमिर पसरला दोघांभंवता;

स्नेहबलावरि दिवा तेवता,
प्रेमबलावरि मदीय हृदयीं पेटत आशेची ज्योती.
अंधारीं एकलेपणाची,
समान होती स्थिति दोघांची;
समान वेळीं जागायाची,
अशा विचारें अधिकचि खिळली नजर सारखी त्यावरती.

( ४ )

नजर लावुनी दीपावरती,
पाहत असतां ऐशारीतीं,
सहजीं दृष्टी वळली वरती;
चंद्रावांचुनि सुन्या नभावरि दिसला तारांचा मेळ.
लुकलुकणाऱ्या इतरांहूनी,
अति तेजस्वी तेज फेकुनी;
प्रामुख्यानें विलसत गगनीं,
सरळ दिव्यावरि नभांत दिसल्या सात तारका तेजाळ.

( ५ )

दीपावरुनी वरि गेलेली,
नजर तेथच्या तेथें खिळली,
दिव्यासंगें दिव्य जाहली;
दिव्यत्वाच्या प्रभावयोगें दिसुनी आलें तिजला.
गगन भासलें जें अवनीवर,
तेथें होतें रम्य सरोवर;
सरोवराच्या विमल जलावर,
अति तेजस्वी सात बालिका करीत होत्या लीला.

( ६ )

खेळखेळतां ऐशारीतीं,
देखुनियां आकाशदिव्याप्रति,
एक बालिका झाली वदती,
" पहा साजणी, पहा ! खालतीं आहे अपुला भाऊ."
" आजपासुनी दोन दिसांनीं,
असे दिवाळी मोददायिनी,
अशा सुमंगल सणालागुनी,
मंगल भाऊबीज कराया त्याला वरती नेऊं."

( ७ )

हर्षुनि वदल्या बाला साही
" छान कल्पना तव ही बाई !
सखे ! जाउनी तूं लवलाही
घेउनि येईं अपुला भाई भाऊबीज कराया."
श्रवुनि सखींच्या या वचनांला,
हर्ष जाहला बहु बालेला,
त्या मोदाच्या भरांत बाला
सजली तेव्हां नभःपथांतुनि अवनीवरि उतराया.

( ८ )

उतरे बाला जईं झरझरा,
गगनीं पसरे तेजपिसारा,
त्या तेजाचा करुनि आसरा
दृष्टी माझी धांवत आली बालेमागें खालीं.
बहीणभाऊ बोलुं लागले,

बोलत होते इतुकें दिसलें,
परी मला तें मुळीं नुमजलें,
सकुतूहल मग दृष्टी माझी पुन्हां दिव्यावरि जडली.

( ९ )

चमत्कार मग काय जाहला ?
ज्या बंधांनीं त्या दीपाला
केलें होतें बद्ध जगाला,
इहलोकींचे बंध सकल ते क्षणांत तुटुनी गेले.
तेजस्वी जी तेवत होती,
लुप्त होइ ती दीपज्योती;
केवळ **भगिनिप्रेमासाठीं**
सोडुनि जगता परलोकाला प्रयाण दीपें केलें.

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ........
विभाग ........
क्रमांक ........
नों. दि. ........

( १० )

ज्या मार्गानें वरी नभाला
दीपासंगें गेली बाला,
मार्ग मला तो नाहीं दिसला;
कुतूहलें परि लोचन वळले गगनीं आपोआप.
सात तारका होत्या जेथें,
अठवा तारा दिसला तेथें;
तदा उमजलें मजला पुरतें,
भगिनीसाठीं गगनीं जाई पृथ्वीवरचा दीप.

( ११ )

दीपतारकांमधील सारें,
देखत माझ्या जें जें घडलें,

पुरेपूर तें हृदयीं ठसलें,
नानापरिचे तरंग तेव्हां मनांत माझ्या आले.
स्वर्लोकींच्या कोठें तारा ?
कुठें दीप जड जगतावरला ?
"**भाऊ**" म्हणुनी परी तयाला,
'**अंधारीं एकला**' पाहुनी वरि तारांनीं नेलें.

( १२ )

अनाथ दुबळे बांधव अमुचे,
अंधारामधिं जगणें ज्यांचें,
अंधारीं ज्यां मरावयाचें,
**स्पर्शासाठीं** केवळ अमुच्या तळमळ ज्यांची चाले;
**आह्मी एका हिंदभूमिचे**
**हिंदी रक्ताचे-मांसाचे,**
निज बंधूंनां बघतों कैचें ?
तळमळ त्यांची पाहुनि अमुचें हृदय मुळीं ना हालें.

( १३ )

मानव्याला पुरे पारखे,
जिवंत असुनी मृतासारखे,
'**भाऊ**' कसले आम्ही सुडके,
दुष्मानासम सदा वागतों बंधुत्वा विसरोनी.
परी आपुल्या सृष्टींमधलीं,
दावुनि आम्हां दृश्यें असलीं,
निसर्ग अमुची करि कानपिळी,
पहावयाचें कार्य आमुचें नजर खुली ठेवोनी.

( १४ )

भाऊबीजेला जायाला,
भगिनी नव्हती कोणी मजला;
परी संकुचित विचार असला,
दृष्टी होतां खुली मनाला मुळीं न माझ्या शिवला.
समानतेचें अंगीं वारें,
तया क्षणाला पुरतें शिरलें;
त्या दृष्टीनें जईं पाहिलें,
**मायभूमिवरि** दिसूं लागल्या असंख्य भगिनी **मजला.**

( १५ )

त्यांतिल होत्या अनाथ कोणी,
बंधू ज्यांनां नव्हता भुवनीं,
किती पोरक्या पितरांवांचुनि,
पोटासाठीं सदैव चाले ज्यांची आटाआटी.
बदमाषांनीं फुसलविलेल्या
कितीक गाई पंकीं रुतल्या,
अनाथ विधवा असंख्य दिसल्या,
उदासीन परि '**समाज**' होता ज्यांच्या दुःखासाठीं.

( १६ )

हाय ! अशांनां कोणि न वाली,
निर्लज्जांची स्वैर टवाळी
मात्र लेखिली ज्यांच्या भालीं,
आत्मत्यागाविणें दिसेना उपाय कांहीं ज्यांनां.
रडत अशांनीं जावें मरुनी,

लक्ष न देती तिकडे कोणी,
हंसणारे परि **वीरशिरोमणि**
उजळपणानें वावरतांना लाज न वाटे त्यांनां !

( १७ )

समाजकंटक घुंघुरव्यांनां,
अबलांनां जे हंसती त्यांनां,
धिक्कार अशा बेशरमांनां,
**प्रो**त्साहन त्या देती त्यांनां सहस्रधा धिक्कार !
विवेकबुद्धी अद्यापीही
मुळीं आमुची जागृत नाहीं,
म्हणुनि निंद्य हें घडतें कांहीं,
**नष्टचर्य** हें तुझें **समाजा !** केव्हां ओसरणार ?

( १८ )

तुवां निसर्गा ! हें अंधारीं
दृश्य दाविलें चेतोहारी;
**समाज** आहे निद्रावश परि,
झोंपेनें झिंगतां तयाला कोठुनि तें दिसणार ?
भर दिवसाच्या सूर्यप्रकाशीं,
जागा करुनी जेव्हां त्यासी,
दाविशील तूं दृश्यें ऐशीं,
तेव्हां कोठें **समाज** अमुचा खडबडुनी बघणार !

( १९ )

**सांग निसर्गा, तूं सूर्याला,**
**समाज अमुचा उजळायाला,**

खुलीं बंधनें जाळायाला,
जगतावरि मग ‘समाज’ अमुचा तेजानें झळकेल.
द्वैतपणाच्या विसरुनि भावा,
बंधूसाठीं बंधू जेव्हां,
शिर हातावरि घेतिल तेव्हां,
मायभूमिवरि सूर्य सुखाचा त्याच दिनीं उगवेल.

बुधगांव, नवंबर १९२१.

---

## ४१ पूर्व–पश्चिम

शार्दूलविक्रीडित

( १ )

**पूर्वेला** उगवोनियां उजळतो जेव्हां रवी उज्ज्वल,
गाती मंगलपाठ भाट वनिंचे, सृष्टी मुदें हांसते,
लाधे भाग्य असें प्रभातसमयीं **पूर्वेप्रती** मंगल,
तेव्हां होवुनि खिन्न **पश्चिम दिशा** पूर्वेकडे पाहते.

( २ )

आकाशीं चढुनी रवी हळुंहळूं, सोडोनि पूर्वेप्रती
माध्यान्हीं ठरतो स्थिरावुनि जरा आकाशमध्यावरी,
हांसे **पूर्व** इथें, तशीच तिकडे हो **पश्चिमा** हांसती,
कांहीं काल समान भाग्य हंसवी दोघींसही यापरी.

( ३ )

मध्यापासुनि **पश्चिमेस** कलतां तेजासवें भास्कर,
औदास्यांत बळावुनी अवकळा **पूर्वेप्रती** ग्रासते;

भाग्याचे नव रंग याच समयीं आंदोलती जीवर
ती भाग्यें दुरळोनि **पश्चिमदिशा पूर्वेस** धिक्कारते.

* * *

**पूर्वेचा** रवि **पश्चिमेस** झुकला, **पूर्वेस** जाई पुन्हां,
भाग्याचा मग व्यर्थ गर्व इतुका कां **पश्चिमा** वाहते ?

धुळगांव, नवंबर १९२२.

---

# ४२ सिंहगड सोडतांना

[ गेल्या मे महिन्यांत एका सन्मित्राच्या प्रेमळ आग्रहामुळें सिंहगडावर जाण्याचा योग आला. परत येतेवेळीं 'पुणेंदरवाज्या'जवळ सर्वांबरोबर गडाचाही निरोप घेतांना, मनांत आलेल्या विचारांचें शब्दचित्र रेखाटण्याचा प्रयत्न खालील गीतांत केला आहे. याच गीतांत एके ठिकाणीं कांहीं मराठे कुळांचा केवळ उदाहरणासाठीं उडता उल्लेख केला आहे. याबद्दल त्या आडनांवाचे मराठे बंधु मला क्षमा करितील अशी आशा आहे. ]

( १ )

सोडुनियां तुज जातों, नगराजा !
लीनाचा प्रणाम घेई माझा;
आतांचा सरला ऋणानुबंध,
तोडावे म्हणुनि लागती बंध;
हा लागे जो जीवास जिव्हाळा,
तोडुनि तो जाणें आलें मजला;
जातांना खळबळ हृदयीं होई,
दावाया वदुनी उमजत नाहीं;

निघतांना पायहि झाले कष्टी;
अश्रूंनीं नयनीं केली दाटी.

( २ )

परि जातों कर्तव्याच्यासाठीं,
लोभाच्या तोडुनि साऱ्या गांठी;
मजवरती अमित लोभ करणारे,
गहिंवरले निरोप देतां सारे;
बघुनी या निर्हेतुक लोभाला,
परतावें वाटे येथुनि मजला;
यायोगें पाउल झालें मंद,
परि इकडे ओढिति दुसरे बंध;
नगराजा! नकोच जातों आतां,
घे माझा प्रणाम जातां जातां.

( ३ )

हे मागें लोटुनि सारे पाश,
तुजवरुनी निघतां उतरायास;
ही इकडे खोल दरी दिसताहे,
हा इकडे कडा भयंकर आहे;
यांनीं तूं दुर्गम एका काळीं,
आज कुठें अभेद्यता ती गेली?
दो शतकांमागें वैभववान,
आज असा होसी भाग्यविहीन;
हें बघुनी होतें चित्त उदास,
आठवतो पूर्वीचा इतिहास;

( ४ )

**शिवबाचा** तूं कलिजा जीवाचा,
तुजसाठीं वीर हरपला त्याचा;
त्या तसल्या अंधाराच्या रातीं,
किति मेले लढतां तुझियासाठीं;
मावळच्या मूठभरच वीरांनीं,
विजयाचा झेंडा फडकावोनी;
शिंपियले सडे इथें रक्ताचे,
रुजवीलें बीज त्यांत ऐक्याचें;
त्यांतूनी '**राष्ट्रवृक्ष**,' फोंफावे,
ज्या बघतां शत्रू थरकांपावे.

( ५ )

राष्ट्राची जोंवरि चढती वेळ,
टवटवला तरु हा कांहीं काळ;
ज्या काळीं **महाराष्ट्रवीरांनीं**,
गाजविलें शौर्या **हिंदुस्तानीं**;
**दख्खनचे** घोडे फुरफुरलेले,
**अटकेच्या** नदींत पाणी प्याले;
त्या काळीं नगराजा! तव कीर्ती,
गाजोनी दिगंत केली होती;
हाय! परी दैवचि उलटें झालें,
त्यासंगें **कालचक्रही** फिरलें!

( ६ )

कालानें देतां उलटी हांक,
ऐक्याची क्षणांत झाली राख;

मग येथें कलहाचें सैतान,
सरसावें घालाया थैमान;
राष्ट्राची ओसरली पुण्याई,
तुजभंवती जंगल नुसतें राही;
वीरांचे बच्चे भवतालींचे,
ते झाले हमाल गोदामाचे;
नगराजा! आतां तूं कोणाचा?
चैनीला येणाजाणाराचा.

(७)

हाय! तुझ्या भंवतालींचीं खेडीं,
भीमथडी जिथें नाचलीं घोडीं;
रक्ताचे पाट वाहले जेथें,
धरणाचें पाणी वाहे तेथें;
**मालुसरे** आणि **घाटगे**, **माने**,
मावळचे किति सांगूं नांवानें;
शेताची खुरपण मात्र करोनी,
गवताला आज दाविती पाणी;
दोष नसे हा मावळबंधूंना,
परि अमुच्या राष्ट्रघातकर्मांना.

(८)

कालाच्या कराल दाढांमाजीं,
सांपडलें राष्ट्र आमुचें आजी;
रगडोनी जरी जाहलें पीठ,
आर्यांचें तेज उरें परि त्यांत;

हीं पतनें आमुच्याच कर्मांचीं,
निमुटपणें भोगुनि सारायाचीं;
सुचवीते ही काळोखी रजनी,
‘ **भाग्याची पहाट ये मागोनी;**’
तोंवरि बा, सर्वभक्षका काला !
हा माझा प्रणाम शतशः तुजला.

( ९ )

नगराजा ! मात्रा कलिकालाची,
तुजपुढती नाहीं चालायाची;
झुंजोनी म्हणुनि आजवरि त्यासी,
उरलासी तसा पुढें तूं उरसी;
नांव तुझें रक्ताच्या शाईनें,
इतिहासीं लिहिलें **तानाजीनें**;
तवरूपें स्मारक **शिवशाहीचें**,
तेजस्वी अखंड झळकायाचें;
तवयोगें ‘ **महाराष्ट्र**’ हें नांव,
कालाचा उरेल घेउनि ठाव.

( १० )

राष्ट्राचीं रणतीर्थें विख्यात,
नगराजा ! श्रेष्ठ असिसि तूं त्यांत;
तुजवरती सदैव संचरणारा,
स्फूर्तीनें मंतरलेला वारा;
तुजवरचे अणुपरमाणू सारे,
**शिवबाच्या** यशगाना गाणारे;

कोणीही तव सहवासा यावें,
येवोनी पावन होउनि जावें;
पूर्वींच्या इतिहासास स्मरावें,
स्फूर्तीच्या पवित्र गाना गावें.

( ११ )

या भावें तुझ्यासंनिधीं आलों,
स्फूर्तीला सेवुनि आज निघालों;
निघतांना खळबळ हृदयीं झाली,
तंद्रीच्या भरांत आलों खालीं;
येतांना, म्हणुनि, न ये नयनांत,
वाटेचा जंगलशाही थाट;
कोळ्यांचें ' मेटें ' वाटेवरलें,
गेलेलें मुळिंही नाहीं कळलें;
केव्हांची उतरण सरुनी गेली;
ही तळची ' **अतकरवाडी** ' आली.

( १२ )

पुण्यमया ! नगराजा ! येथोनी,
जायाचें आतां तुज सोडोनी;
दु:सह हा विचार मनिं येवोनी,
डोळ्यांना घळघळ आलें पाणी;
जायाला मुळीं निघेना पाय,
परि झाला, काय करूं ? निरुपाय.
दडपण हें सारें हृदयावरचें,
काढोनी हाय ! मला जायाचें;

जायाचें ह्मणुनी जातों आतां,
घे माझा प्रणाम जातांजातां.

बुधगांव,
सप्टेंबर, १९२२.

---

## ४३ स्फुट अभंग

( १ )

नको देवा ! कधीं देऊं, कोणा परतंत्र जिणें;
त्याच्याहुनी दारोदारीं, बरें भिक्षान्न सेवणें. १
लाथाडील कोणीकोणी, दीन भिकारी ह्मणोनी;
पुरवलें तेंही देवा ! कटु पारतंत्र्याहूनी. २
अर्धपोटी राहोनीयां, कोर निढळ्या घामाचा;
पक्वान्नाच्या राशीहूनी, आदरीन कायावाचा. ३
विचारांची जेथें वीक, होते ताबेदारीपायीं;
अशा नाठाळ बाजारीं, वागण्याची तथा नाहीं. ४
तोंडदेखलें बोलाया, नाहीं जिवाला सराव;
जरी बोलीयेलें कधीं, होई मागुती पस्ताव. ५
चुकूनीही स्पष्टवाणी, जरी बरळली जिव्हा;
झणीं त्याचा विपर्यास, माथ्यावरी आदळावा. ६
ऐशापरीची कांचणी, जाच करी **चक्रपाणी**;
धीर द्यावया व्यसनीं, कोण तुझियावांचोनी. ७
त्रिभुवनीं गाजवीलें, भक्तकैवारी या नांवा;
हांकेसाठीं '**विहारीच्या**', झडकरी देवा ! धांवा. ८

बुधगांव,
जून १९२२.

---

# ४४ एक मागणें

**चाल**–गज्जल.

जिथें ऐश्वर्यवंतांचा, शकेना जावया तोरा,
जगाच्या द्वेषबुद्धीला, जिथें नाहीं मुळीं थारा,
निसर्गाचा खुला आहे, जिथें सेवावया मेवा,
तया ठायीं मला देईं, सदाचा वास तूं देवा !

मिळाला कोर पोटाला, तयानें तुष्ट जे होती,
भिजोनी चिंब घामानें, धन्याला जे दुवा देती,
इमानी माणसें ऐशीं, जिथें वसतात आनंदें,
तया ठायीं मला देवा ! सदाचा वास लाभूंदे. २

असोनी दक्ष संसारीं गुणांनी जेथल्या ललना,
सदा जपतात रक्षाया, कुलाच्या योग्य अभिमाना,
अशा या नांदती ह्मणुनी असे पावित्र्य ज्या भूला,
तया भूमीवरी वसती सदाची लाभुंदे मजला. ३

नसांतूनी जरी वाहें, स्वदेशप्रेम हें रुधिर,
कृतीनें दाविती वदनीं 'फुकाचे शब्द' नसणार,
प्रसंगीं पेट घेणारे, असे वसती जिथें तरुण,
वसाया देइं तूं देवा ! मला ऐसें सदा स्थान. ४

सदा केली निसर्गानें, जयांची वाढ जोमाची—
फुलांवाणी मुलें जेथें, खुल्या उल्हासवृत्तीचीं,
अशीं तेजाळ नक्षत्रें, प्रकाशा देतिं ज्या ठायीं,
तया स्थानीं मला देवा ! सदाचा वास तूं देईं. ५

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

खुलें आकाश ज्या ठायीं, खुला वाहे जिथें वारा,
सभोंतालीं खुली सृष्टी, खुला खगवृंद गाणारा,
खुल्या सृष्टींमधें ऐशा, खुले वसती जिथें जीव,
अशा ठायीं मला देईं, तुझ्या पायीं सदा ठाव. ६

बुधगांव, जुलै १९२२.

---

## ४५ रसिकांस विनंति

( चाल—कपोला कपोलाचि० )

कवी वंद्य होवोनि गेले महा,
तयांच्या पदांचाच मी दास हा.
सदा बैसुनी 'शारदे'च्या पदीं,
तिनें प्रेरितां, गाइलें या पदीं. १

मुळीं नेणतों गायनाची कला
जरी जाहलें ठाउकें हें मला;
तुम्हीं प्रेम दावोनि प्रोत्साहिलें,
म्हणोनीच हें कांहिंसें गाइलें. २

पुढें गायनाची असे कामना.
रसज्ञां ! कराया तिच्या पूरणा,
असूंदे सदा प्रेम माझ्यावरी,
'विहारी' तुम्हां ही विनंती करी ३

बुधगांव,
१० फेब्रुआरी १९२३.

---

# ‘काव्यविहारा’वरील

## निवडक अभिप्राय.

१ इचलकरंजी संस्थानचे अधिपति **श्रीमंत नारायणराव बाबा-साहेब घोरपडे** यांचा अभिप्रायः—

“ ‘**काव्यविहारी**’ यांच्या ‘**काव्यविहारां**’तील बहुतेक कविता चांगल्याच असून कांहीं प्रकरणें बहारीचीं आहेत.”

२ सांगली विलिंग्डन कॉलेजचे प्रिन्सिपाल **गोविंद चिमणाजी भाटे**, M. A. यांचा अभिप्रायः—

“ ‘**काव्यविहारी**’ या नांवानें मासिकपुस्तक–वाचकांस चिर-परिचित असलेले माझे मित्र रा. गद्रे यांनीं आपल्या निवडक काव्य-संग्रहांतील कांहीं कविता—विशेषतः ‘नवमतवादी’ कवनें—स्वतः वाचून दाखविलीं. या काव्यश्रवणानें मला फार आनंद वाटला. रा. गद्रे यांची कविता साधी, सोपी व सरळ असून सरसही आहे. रा. गद्रे यांनीं क्लिष्ट कल्पना व शब्दावडंबर यांच्यायोगें आपल्या कवितेंत कृत्रिम नटवेपणा आणण्याचा प्रयत्न केला नाहीं हें फार चांगलें केलें. कारण अलीकडे असली प्रवृत्ति वाढत्या प्रमाणावर आहे. प्रसादगुणयुक्त उदात्तार्थ हा काव्याचा आत्मा आहे असें माझें मत आहे, व रा. गद्रे यांच्या कवितेंत हा आत्मा सर्वत्र दृग्गोचर होतो. रा. गद्रे यांचे हातून अशीच–किंबहुना याहीपेक्षां वरचढ काव्यनिर्मिति

होऊन मराठी वाङ्मयांत अधिकाधिक भर पडत जाईल अशी आशा आहे."

३ प्रख्यात नाटककार, कवि व टीकाकार श्रीयुत **श्रीपाद कृष्ण कोल्हटकर,** B. A., LL. B. यांचा अभिप्राय:—

"'**काव्यविहारी**' यांच्या कवितेंत नवीन सांप्रदायाच्या कवितेंतील जोम असून कोणत्याहि आधुनिक कवीचें अनुकरण नाहीं, ह्मणून कृत्रिमपणाहि नाहीं; यामुळें ती फार आल्हादजनक वाटते. त्यांचा काव्यसंग्रह लौकरच प्रसिद्ध होणार हें पाहून मराठी भाषेच्या प्रत्येक अभिमान्यास आनंद होईल यांत संशय नाहीं."

४ इंदूरचे श्री. **माधवराव विनायकराव किबे,** M. A., M. R. A. S. यांचा अभिप्राय:—

"'**काव्यविहारी**' यांच्या कविता मराठीच्या प्रतिष्ठित मासिकांत प्रसिद्ध झालेल्या सर्वांच्या परिचयाच्या झाल्या आहेत. त्यांतील उत्कट विचार, उदात्त भावना, चित्ताकर्षक वृत्तें, व मनोहर रचना यायोगानें त्या सर्वप्रिय झाल्या आहेत. त्या एकत्र छापविल्या गेल्यास मराठी भाषेंत एक उत्तम संग्राह्य पुस्तक होईल."

अनुक्रम ..........
विभाग ..........
क्रमांक ....
नों. दि. ....
2363
REFBK-0002343
REFBK-0002343

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध |
|---|---|---|---|
| ९ | २ | दग | दंग |
| ११ | २२ | नज | नच |
| १३ | २० | दुममदुला | दुमदुमला |
| २५ | १६ | गुंफणारी | गुफणारी |
| २६ | ९ | हळूंहळं | हळुंहळूं |
| ३१ | ८ | उमटली | उलटली |
| ३३ | १३ | साहाय्य | सहाय्य |

कवि काव्यविहारी यांचीं

# गड्यांवरील गाणीं

लवकरच प्रसिद्ध होतील.

**गोखले आणि मंडळी,**

बुधगांव, S. M. C.